रविवार, ७ ऑगस्ट २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक २१
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## कोरोनाचा प्रादूर्भाव वाढल्याने केंद्राकडून सतर्कतेच्या सूचना



**नवी दिल्ली** : देशातील वाढत्या कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेता केंद्राने देशातील सात राज्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी दिल्ली, केरळ, कर्नाटक, ओडिशा, तामिळनाडू, तेलंगणा आणि महाराष्ट्राच्या आरोग्य सचिवांना निर्देशांचे काटेकोर पालन करण्याबाबत पत्र लिहिले आहे. या राज्यांमध्ये आठवड्याचा कोरोना संसर्गाचा दर १० टक्क्यांपेक्षा अधिक आहे. या राज्यांनी लसीकरण मोहिमेला वेग देण्यासोबतच कोरोना नियमांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना आरोग्य मंत्रालयाकडून देण्यात आल्या आहेत. येत्या काळात अनेक सण, उत्सव भारतात साजरे केले जातील. यासाठी ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सामाजिक अंतर राखणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे आरोग्य मंत्रालयाने पत्राद्वारे कळविले आहे.

अंतरंग
कळंबोलीतील विविध नागरी समस्या मार्गी/३
म्हसळ्यात खैराची वाहतूक करणारा टेम्पो जप्त/५
प्रभात कोळी ठरला सर्वोत्कृष्ट जलतरणपटू/८

# जगदीप धनखड देशाचे नवे उपराष्ट्रपती

### ११ ऑगस्ट रोजी घेणार शपथ



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

देशाच्या नवीन उपराष्ट्रपतींच्या निवडीसाठी शनिवारी (दि. ६) मतदान झाले. या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार जगदीप धनखड यांचा विजय झाला असून ते देशाचे नवे उपराष्ट्रपती म्हणून ११ ऑगस्ट रोजी शपथ घेणार आहेत. जगदीप धनखड यांच्या विजयानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार जगदीप धनखड यांच्याविरोधात विरोधी पक्षाच्या (यूपीए) उमेदवार मार्गारेट अल्वा यांच्यात शनिवारी लढत झाली. जगपदीप धनखड यांना ५२८ मते तर मार्गारेट अल्वा यांना १९७ मते मिळाली. धनखड ७१ वर्षांचे असून ते राजस्थानमधील प्रभावशाली जाट समाजाचे आहेत.

अल्वा या काँग्रेसच्या ८० वर्षीय ज्येष्ठ नेत्या असून, त्यांनी राजस्थानचे राज्यपाल म्हणूनही काम पाहिले आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने अल्वा यांच्या नावाच्या घोषणेपूर्वी एकमताचे प्रयत्न झाले नाहीत, असा दावा करून मतदान प्रक्रियेपासून दूर राहण्याची घोषणा केल्याने उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीवरून विरोधी पक्षांमध्येही मतभेद निर्माण झाले. त्याचा फायदा जगदीप धनखड यांना झाला.

*उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक दर पाच वर्षांनी होते. या निवडणुकीसाठी संसदेच्या दोन्ही सभागृहातील खासदारांनाच मतदानाचा अधिकार असतो. सध्या संसदेची एकूण खासदार संख्या ७८८ आहे, मात्र राज्यसभेतील आठ राष्ट्रपतीनियुक्त सरकारची पदे न भरल्याने प्रत्यक्ष मतदारांची संख्या ७८० होती. त्यापैकी ७२५ खासदारांनी मतदान केले. ५५ खासदारांनी मतदान केले नाही. यात तृणमूल काँग्रेसच्या ३४, शिवसेना व स. पा. च्या प्रत्येकी दोन खासदारांचा समावेश आहे.*

## बूस्टर डोसमध्ये तीन पटीने वाढ



**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या १५ दिवसांत बूस्टर डोस घेण्याच्या संख्येत जवळपास २४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. लसीकरणाच्या आकडेवारीनुसार, १ जुलै ते ५ जुलैदरम्यान ४८,६२४ लाभार्थींनी बूस्टर डोस घेतला होता जो १६ जुलै ते ३१ जुलैदरम्यान वाढून एक लाख ८९ हजार ५३०वर पोहचला.

अधिकाऱ्यांनी या वाढीचे श्रेय केंद्राच्या आझादी का अमृतमहोत्सवासाठी ७५ दिवसांच्या मोफत लसीकरण मोहिमेला दिले आहे. कोविड-१९ रुग्णांमध्ये झालेली घट आणि लसीकरणाचा फायदा तसेच भारत सरकारने हा डोस मोफत केल्याने लसीकरणाला चालना मिळाली आहे.

बूस्टर डोसला प्रोत्साहन देण्यासाठी कार्यालये, मॉल्स आणि साप्ताहिक बाजारांव्यतिरिक्त गणेश मंडळे येथे लसीकरण मोहीम राबवत आहोत. शिवाय, सर्व जवळपास कालबाह्य होणाऱ्या सर्व लसींचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या ज्यामुळे आम्हाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे लसी कालबाह्य होणार नाहीत, असे राज्य आरोग्य विभागातील वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले.

## लोकसभा निवडणुकीसाठी भाजपचे मिशन

**ठाणे : प्रतिनिधी**

राज्यात एकीकडे मंत्रिमंडळ विस्तारात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री व्यस्त असतानाही भाजपने पक्षसंघटनेवर विशेष भर दिला आहे. आगामी काळात होणाऱ्या लोकसभा निवडणुकांच्या अनुशंगाने रणनिती आखली जात असून महाराष्ट्रात नऊ केंद्रीय मंत्र्यांचा दौरा नियोजित आहे. यामध्ये कार्यकर्त्यांशी संवाद आणि पक्ष संघटनेवर भर दिला जाणार आहे, अशी माहिती भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

एकीकडे राज्यात सत्तापरिवर्तनामध्ये भाजप हा केंद्रबिंदू राहिलेला आहे. त्या अनुशंगाने भाजपचा मेगा प्लॅन सुरू असून पक्षवाढीसाठी आणि लोकसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्यातील १६ लोकसभा मतदारसंघात नऊ केंद्रीय मंत्री दाखल होणार आहेत. वेगवेगळे प्रकारचे २१ कार्यक्रम हे मंत्री मतदारसंघात घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### महाराष्ट्रात नऊ केंद्रीय मंत्र्यांचा दौरा



### या मंत्र्यांची फौज सज्ज

राज्यातील १६ लोकसभा मतदारसंघामध्ये कल्याण लोकसभेला आणि मध्य दक्षिण मुंबई लोकसभेला अनुराग ठाकूर, दक्षिण मुंबईला नारायण राणे, पालघरला विश्वेश्वर तुडु, शिर्डीमध्ये प्रल्हाद पटेल येणार आहेत तर बारामतीला केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांचा दौरा असणार आहे. केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांचा तीन दिवसीय दौरा कल्याणमध्ये होणार आहे. आगामी काळात दौरे होणार असून कार्यकर्त्यांच्या अडचणीही जाणून घेतल्या जाणार आहेत.





**पनवेल : शहरातील हर घर तिरंगा अभियानाला भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शनिवारी भारतमाता की जय या घोषणेने प्रारंभ केला. या वेळी भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारूशिला घरत, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सर्व माजी नगरसेवक, नगरसेविका तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.** (छाया : लक्ष्मण ठाकूर)

## निवडक

### मुंबई एअरपोर्टवर १०.४५ कोटी रुपयांचे हेरॉईन जप्त

**मुंबई** : हेरॉईन तस्करीप्रकरणी अंगोलाच्या एका नागरिकाला मुंबईत अटक करण्यात आली. अटक केलेला अंगोलन नागरिक पोटात लपवून हेरॉईनची तस्करी करीत होता. त्याच्याकडून सीमाशुल्क विभागाने दीड किलो हेरॉईन जप्त केले आहे. जप्त केलेल्या हेरॉईनची आंतरराष्ट्रीय बाजारानुसार किंमत १०.४५ कोटी एवढी आहे.

### पुण्यात एमपीएससी परीक्षेदरम्यान गैरप्रकार

**पुणे** : पुण्यात एमपीएससी परीक्षेदरम्यान एका उमेदवाराकडे फोन आणि ब्ल्युटूथ हेडसेट सापडल्याने खळबळ उडाली असून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. एमपीएससीने याबाबत ट्विट करून माहिती दिली आहे. पुणे जिल्ह्याच्या नऱ्हे येथील उपकेंद्रावर केवलसिंग चैनसिंग गुसींगे या उमेदवाराकडे मोबाईल व ब्लुटूथ इयरफोन सापडले. या उमेदवारावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

## गायिका मुग्धा गावकर यांच्या गायनाने पनवेलकर मंत्रमुग्ध





### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, नादब्रम्ह साधना मंडळ खारघर आणि पनवेल तालुका सांस्कृतिक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमात गोवा राज्यातील सुप्रसिद्ध गायिका मुग्धा गावकर यांच्या गायनाने रसिक श्रोते मंत्रमुग्ध झाले.

शहरातील मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, (पान २ वर...)

## गोंदिया अत्याचाराची एसआयटी चौकशी

**गोंदिया : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सावरटोली येथील महिलेवर झालेल्या घृणास्पद अत्याचाराची गंभीर दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली असून, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी आयपीएस दर्जाच्या महिला पोलीस अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील एसआयटीमार्फत करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

हे प्रकरणाचा तपास फास्ट ट्रॅकवर करून आरोपींच्या मुसक्या आवळण्याचे त्याचप्रमाणे कठोर शासन आरोपींना करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी पोलीस महासंचालकांशीही चर्चा केली. पीडित महिलेला सर्वतोपरी उपचार मिळावेत, कुठलीही हयगय यात होणार नाही हे पाहण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलचे जिल्हास्तरीय स्पर्धेत यश

### यशस्वी विद्यार्थ्यांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून अभिनंदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल सिबीएसईच्या विद्यार्थ्यांनी विविध जिल्हास्तरीय स्पर्धेत घवघवतील यश मिळवले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे रयतचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करीत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.



कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या चौथीमधील प्रिशा कोंढाळकर हिने तालुकास्तरीय निमंत्रित स्पर्धेमध्ये १० वर्षांखालील मुलींच्या गटात ५० मीटर फ्रीस्टाईल स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला. त्याचप्रमाणे कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी येथे झालेल्या जिल्हास्तरीय स्विमिंग स्पर्धेमध्ये ५० मीटर फ्रीस्टाईल, ५० मीटर ब्रेस्ट, ५० मीटर बॅकस्ट्रोक व ५० मीटर बटरफ्लाय या प्रकारामध्ये एकूण तीन सुवर्ण व रौप्य पदक पटकावून संस्थेचे व शाळेचे नाव उंचावले. कामोठे येथे झालेल्या जिल्हास्तरीय सिलंबम स्पर्धेमध्ये १० वर्षांखालील मुलांच्या गटात चौथीतील स्पर्श मोरे याने सुवर्ण पदक पटकावले आहे. पिल्लई कॉलेज रसायनी येथे रायगड जिल्हा अथेलेटिक्स असोसिएशनद्वारे आयोजित जिल्हास्तरीय अजिंक्य पद व राज्य निवड चाचणी मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. (पान २ वर...)

## पनवेल ते कोन बससेवा पूर्ववत करा

### आमदार महेश बालदी यांची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल बस आगारातून एसटी महामंडळाच्या पनवेल ते कोनमार्गे सावळे-आपटा-जांभिवली ही बससेवा पूर्ववत करण्यात याव्यात, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी आगार व्यवस्थापकांकडे केली आहे.

या संदर्भात आमदार महेश बालदी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सावळे, गुळसुंदे, आपटा, जांभिवली या ग्रामपंचायती ग्रामीण भागांतील असून या भागांतील ग्रामस्थांना पनवेल येथे खरेदी, शिक्षण, नोकरी, व्यवसायासाठी वारंवार जावे लागते. या भागात औद्योगिक कारखानेही मोठ्या प्रमाणावर आहेत. कोरोना काळापूर्वी या भागांत एसटी बसेसची सुविधा उपलब्ध होती, मात्र या सेवा बंद झाल्यामुळे, ग्रामस्थांना, कामगारांना खासगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे, तसेच सध्या शाळा, कॉलेज सुरू झाल्याने विद्यार्थ्यांचीही गैरसोय होत आहे.

या ग्रामीण परंतु औद्योगिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण भागातील ग्रामस्थ तसेच कामगार यांचे पनवेल शहरी भागाशी दळणवळण सुरू होण्यासाठी, तसेच ग्रामस्थांना व कामगारांना सोसावी लागणारी आर्थिक झळ दूर करण्यासाठी पनवेल-कोन मार्गावरील सर्व एसटी बससेवा सुरू करण्यात यावी, असे या निवेदनात म्हटले आहे.



# मंत्रिमंडळ विस्तार लवकरच

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना सुतोवाच

**दिल्ली : प्रतिनिधी**

मंत्रिमंडळ विस्तार लवकरच होईल. सद्यस्थितीत राज्यातील कोणतेही काम थांबलेले नाही. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून घ्यायचे ते निर्णय घेतलेले आहेत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली येथे प्रसार माध्यमांशी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.



शिवसेनेत बंडखोरी झाल्यानंतर राज्यात मोठे सत्तांतर झाले. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकार जाऊन भाजपा व शिवसेनेतील एकनाथ शिंदे गटाने सरकार स्थापन केले. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून आणि देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मात्र, त्यानंतर अनेक दिवस उलटूनही शिंदे-फडणवीस सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार झालेला नाही. यावरून विरोधी पक्षांकडून जोरदार टीका होऊ लागली. याला सडेतोड उत्तर भाजप आणि शिंदे गटाकडून दिले जात आहे. यातच शनिवारी (दि. ६) मुख्यमंत्री शिंदे व उपमुख्यमंत्री फडणवीस दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर गेले. याबाबत मुख्यमंत्री शिंदे यांना विचारणा केली असता त्यांनी हा दौरा मंत्रिमंडळ विस्ताराबाबत नसल्याचे स्पष्ट सांगितते. दिल्लीत विमानतळावर पोहचल्यावर ते माध्यमांशी बोलत होते. मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले, दिल्लीत होणारी बैठक शासकीय आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाबाबत बैठक ठेवली आणि नीती आयोगाचीही बैठक आहे. मुख्यमंत्र्यांसोबतची ही बैठक दरवर्षी होते. या दोन्ही महत्त्वाच्या बैठका असल्याने मी दिल्लीला आलो आहे. यावर प्रसार माध्यमांनी त्यांना मंत्रिमंडळ विस्ताराबाबत विचारले असता एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दौऱ्याचा आणि राज्यातील मंत्रिमंडळाच्या विस्ताराचा काहीही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. आमचा मंत्रिमंडळ विस्तार लवकरच होणार असल्याचेही ते म्हणाले. तसेच राज्यातील कोणतेही काम थांबलेले नाही. आम्ही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून जे निर्णय घ्यायचे ते घेतले आहेत. ते काम कोठेही थांबलेले नाही असेही मुख्यमंत्री शिंदेंनी या वेळी नमूद केले. पुढच्या आठवड्यापर्यंत मंत्रिमंडळ विस्तार होईल का? असाही प्रश्न माध्यमांनी विचारला असता, पुढील आठवडा कशासाठी, त्याआधीच मंत्रिमंडळ विस्तार होईल, असेही ते म्हणाले. यावेळी मुख्यमंत्र्यांनी गोंदियातील महिलेवर झालेल्या अत्याचारावरही भाष्य केले. ते म्हणाले, महिलेवरील अत्याचाराबाबत पोलीस तपास करत आहेत. कुणालाही पाठिशी घातले जाणार नाही. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असेही ते म्हणाले.

# प्रतिक पवार हल्ल्याची चौकशी 'एनआयए'कडे सोपवा

## भाजपचे आमदार नितेश राणे यांची मागणी

**मुंबई : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील (जि. नगर) प्रतिक पवार या युवकावर समाज माध्यमांतून नुपूर शर्मा यांचे समर्थन केल्यामुळे मुस्लीम युवकांनी केलेल्या हल्ल्याची राष्ट्रीय तपास यंत्रणेमार्फत चौकशी करावी, अशी मागणी भाजपचे आमदार नितेश राणे यांनी शनिवारी (दि. ६) केली. पुढील काळात हिंदूवरील हल्ले सहन केले जाणार नाहीत, असा इशाराही आमदार राणे यांनी या वेळी दिला आहे.



भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आमदार नितेश राणे बोलत होते. आमदार राणे पुणे म्हणाले की, नुपूर शर्मा यांच्या समर्थनार्थ पोस्ट केल्याप्रकरणी चार ऑगस्टला अहमदनगर येथील कर्जत तालुक्यातील प्रतीक पवार या तरूणावर काही तरूणांनी धारदार शस्त्रांनी हल्ला करत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. यात पवार हा युवक गंभीर जखमी झाला. या हल्ला प्रकरणी फरार आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी ही त्यांनी केली. दरम्यान, नुपूर शर्मा यांच्या वक्तव्यानंतर उदयपूर, अमरावती व आता कर्जत येथे घडलेली ही तिसरी घटना आहे. हिंदूवर वारंवार हल्ले केले जात आहेत. यापुढे हे हल्ले खपवून घेतले जाणार नाहीत असाही इशारा आ. राणे यांनी दिला.

आमदार राणे म्हणाले की, भाजपाने नुपूर शर्मा यांच्या त्या व्यक्तव्याचे समर्थन केले नाही. त्यांना पक्षातून निलंबित केले. हा विषय आता संपला असताना हिंदूवर असे हल्ले होत आहेत. राज्यात मविआ सरकार नसून हिंदुत्व जपणारे सरकार आहे, तेव्हा अशा प्रकारे हल्ले करण्याचे प्रयत्न कोणी करू नये असेही आमदार राणे म्हणाले.

# जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्ताने परिचारिका, आशा सेविकांसाठी कार्यशाळा

**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्ताने पनवेल महापालिकेच्या वतीने परिचारिका व आशा सेविकांसाठी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात 'स्तनपान व शिशुपोषण' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये युनीसेफचे राज्य सल्लागार डॉ. पांडुरंग सुदामे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.



आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेचे उद्घाटन अतिरीक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, डॉ. पांडुरंग सुदामे, मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.आनंद गोसावी, आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका यांच्या उपस्थितीत करण्यात आले. डॉ. सुदामे म्हणाले, आईचे दूध हे बाळासाठी अमृतासमान असते. आईच्या दुधात बाळाच्या वाढीसाठी आवश्यक असणारे सर्व पोषक तत्वे योग्य प्रमाणात असतात. आईचे दूध निर्जंतुक असून यामुळे बाळाची रोगप्रतिकारक शक्ति वाढते असे सांगून त्यांनी स्तनपानाचे आईला होणारे फायदेही सांगितले. जागतिक स्तनपान सप्ताहानिमित्ताने नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिचारिका व आशा सेविकांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजनही यावेळी करण्यात आले होते. महापालिका क्षेत्रातील सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांतील परिचारिका, आशा सेविका कार्यक्रमासाठी उपस्थित होत्या.

## दाऊद टोळीतील सलीमला 'एनआयए' कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

दहशतवाद्याला निधी पुरवल्याच्या आरोपाखाली राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) कुख्यात छोटा शकीलचा साडू मोहम्मद सलीम कुरेशी उर्फ सलीम फ्रुटला अटक केली होती. न्यायालयाने त्याला १७ ऑगस्टपर्यंत एनआयए 'कोठडी सुनावली. याप्रकरणी 'एनआयए'ने मुंबई आणि मीरा-भाईंदर परिसरातील दाऊद टोळीशी संबंधित २९ ठिकाणांवर छापे टाकले होते.

सलीम फ्रुट हा दाऊदचा विश्वासू छोटा शकील याचा साडू असून यापूर्वी याप्रकरणी 'एनआयए' त्याची चौकशी केली होती. सलीम फ्रुट हा मुंबई सेंट्रल येथील रहिवासी आहे. तो छोटा शकीलच्या नावाने खंडणी गोळा करत होता. ही रक्कम दाऊद टोळीच्या दहशतवादी कारवायांसाठी वापरण्यात येते, असा आरोप आहे. याप्रकरणी गुरुवारी एनआयएने त्याला अटक केली. 'एनआयए' ने पाच जणांचे जबाब नोंदवले होते. तसेच छाप्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांच्या सहाय्याने आरोपीला अटक करण्यात आली.

# वाडांबा येथे एस. टी. बस आणि मिनीव्हॅनची धडक; सहा जखमी

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील वाडांबा गावाजवळ एस. टी. बस आणि मिनीव्हॅनची समोरा-समोर टक्कर होऊन गंभीर अपघात झाला. अपघातात मिनिव्हॅनमधील सहा प्रवासी जखमी झाले. हा अपघात दुपारी १.४५ वा. च्या सुमारास घडला.

अधिक वृत्त असे, भिवंडी डेपोची श्रीवर्धनकडे जाणारी बस वाडांबा पुढील एस टर्नवरील चढाव चढत होती. याचवेळी श्रीवर्धनकडून मिनीव्हॅन येत होती. दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक बसली. मिनिव्हॅनमधील सहा प्रवासी जखमी झाले. दरम्यान, अपघाताचे वृत्त कळताच पो.नि. योगिता मांडे, हेड कॉन्स्टेबल स्वप्नाली पवार, पो. ना. गणेश मुंडे, राजेंद्र खाडे यांनी घटनास्थळी भेट दिली. जखमींवर म्हसळा ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी महाड येथे पाठविण्यात आले.





# ज्येष्ठ, दिव्यांग आणि विद्यार्थ्यांना एनएमएमटी बस भाड्यात सवलत

### तत्कालीन नगरसेविका नगरसेविका नेत्रा किरण पाटील आणि आरती नवघरे यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील ज्येष्ठ नागरीकांना, दिव्यांग व १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांना नवी मुंबई परिवहन क्षेत्रातील एनएमएमटी बस भाड्यात सवलत मिळणार आहे. दिव्यांगांना तिकीट भाडयात १०० टक्के, १८ वर्षांखालील विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिक यांना तिकीट भाडयात ५० टक्के सूट देण्यात येणार आहे. या कामी पनवेल महापालिकेच्या तत्कालीन नगरसेविका नेत्रा किरण पाटील आणि आरती नवघरे यांनी पाठपुरावा केला होता. तसेच त्यांनी आयुक्त देशमुख आणि अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ यांच्याकडेही वारंवार पत्रव्यवहार केला होता.

या पत्रांची दखल घेत पनवेल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या ठरावाप्रमाणे महानगरपालिकेने पालिका क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांना नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रमामध्ये तिकीट भाड्यात सवलत देण्यात येणार आहे. या सवलतीचा लाभ घेण्यासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिक, १८ वर्षांखालील विद्यार्थी व दिव्यांगांनी महानगरपालिकेतील समाज विकास विभागात येऊन अर्ज करावे, आपली नाव नोंदणी करावी. त्यानंतर त्यांना महापालिकेकडून सवलतीचे ओळखपत्र देण्यात येणार आहे. पनवेल महापालिकेचे हे सवलत ओळखपत्र एनएमएमटी बसमध्ये दाखविल्यानंतरच लाभार्थ्यांना सवलत मिळणार आहे.





**पनवेल : अल्पसंख्याक मोर्चाचे युवा नेते ॲड. इर्शाद शेख यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या.**

## हर घर तिरंगा जनजागृती मोहिमेंतर्गत खारघरमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिका स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत 'हर घर तिरंगा' जनजागृती अभियान राबवित आहे. आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार (दि. ५ ) रोजी खारघर येथील सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनियरिंगच्या एनएसएसच्या विद्यार्थ्यांना 'घरोघरी तिरंगा' जनजागृती अभियानात सामील करून घेण्यात आले.

यावेळी सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, मुख्याध्यापक डॉ. मंजुषा देशमुख, एनएसएस प्रोग्रॅम ऑफिसर डॉ.सुनीता पाल, सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनियरिंगचे एनएसएसचे २५० विद्यार्थी यावेळी मार्गदर्शन शिबिरात सहभागी झाले. यावेळी उपायुक्त विठ्ठल डाके यांनी 'हर घर तिरंगा' या अभियानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच उपायुक्त डाके यांनी विद्यार्थ्यांना 'घरोघरी तिरंगा'अभियानाचा प्रसार, प्रसिध्दी करण्यासाठी सोशल मिडीयाचा वापर करावा तसेच नागरिकांनी झेंड्यासोबतच्या सेल्फी 'पनवेल महानगरपालिकेच्या' फेसबुक पेजला टॅग करण्याबाबत सांगितले.

सहभागी विद्यार्थ्यांनीदेखील 'हर घर तिरंगा' अभियानात सक्रिय सहभाग घेऊन प्रचार व प्रसार करण्याचे करण्याचे आश्वासन दिले. 'घरोघरी तिरंगा' अंतर्गत विद्यार्थ्यांना झेंडा फडकविण्याबाबत विविध सूचना देण्यात आल्या तसेच हे अभियान यशस्वी करण्यासाठी शुभेच्या देण्यात आल्या.



# मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सीकेटी महाविद्यालयाचे यश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनी येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान कॉलेजने (दि. ४) २०२२ राहुल धारकर महाविदयालय, कर्जत येथे संपन्न झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सव उत्तर रायगड सांस्कृतिक स्पर्धांच्या प्राथमिक फेरीमध्ये २४ पारितोषिके प्राप्त करून आपली यशस्वी वाटचाल कायम राखली आहे.

दरवर्षी होणाऱ्या या स्पर्धांमध्ये उत्तर रायगड जिल्ह्यातील एकूण २९ महाविद्यालये सहभागी झाली होती. या स्पर्धांमध्ये नृत्य, अभिनय, साहित्य, फाईन आर्ट व संगीत या क्षेत्रातील एकूण ३० वैयक्तिक आणि सांघिक प्रकारांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाने सर्वच्या सर्व स्पर्धा प्रकारामध्ये सहभाग घेतला होता. ३० स्पर्धांपैकी २८ स्पर्धा प्रकारांचे निकाल जाहीर करण्यात आले.

या महाविद्यालयाने २४ पारितोषिके प्राप्त केली. यात २४ पारितोषिकांपैकी १७ प्रथम क्रमांकाची पारितोषिके, सहा द्वितीय क्रमांकाची आणि एक तृतीय क्रमांकाचे पारितोषिक महाविद्यालयाने प्राप्त करत सलग अठरा वर्ष रायगड जिल्हा विभागीय चॅम्पियनशिप जिंकण्याचा बहुमान मिळविला. यामध्ये चित्रकला प्रथम-रोहीत ढोबले, शिल्पकला प्रथम-नितेश मानकामे, काटूनिंग प्रथम-ऋतुजा पाटील, कोलाज प्रथम-शाहु सालगरे, पाश्चात्य वादन प्रथम-प्रथम गोवेकर, एकपात्री अभिनय मराठी प्रथम-विशाल तायडे, पाश्चात्य गायन प्रथम-कोमल राजगुरू, नाटय संगीत गायन प्रथम-निलेश गायकवाड, शास्त्रीय वादन (तालवाद्य)प्रथम-वैषव पाटील, मराठी कथाकथन प्रथम-प्रिया चौधरी, हिंदी कथाकथन द्वितीय- निशा जांगीड, सुगम संगीत द्वितीय-निलेश गायकवाड, वत्कृत्व मराठी द्वितीय-कृष्णाली जोशी, मेहंदी तृतीय-आचल सोनकर यांना वैयक्तिक पारितोषिके मिळाली आहेत.

सांघिक पारितोषिके- वादविवाद स्पर्धा मराठी प्रथम-कृष्णाली,. प्रिया, वादविवाद हिंदी प्रथम-कृष्णाली, निशा, लघुनाटय मराठी प्रथम-महती गडकरी आणि संघ, लघुनाट्य हिंदी प्रथम-रोहित देशमुख आणि संघ, पाश्चात्य ग्रुपगायन स्पर्धा प्रथम-अंकिता आणि संघ, मुकनाटय प्रथम- श्रीश म्हात्रे आणि संघ, भारतीय ग्रुपगायन प्रथम-आचल रावत आणि संघ, भारतीय लोकनृत्य द्वितीय-श्वेता आचरे आणि संघ, एकांकीका स्पर्धा मराठी द्वितीय-कुमार परीन मोरे आणि संघ, एकांकीका स्पर्धा हिंदी द्वितीय-स्नेहल नरवाडे आणि संघ. सन २००५ ते २०२२ या १७ वर्षामध्ये चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने या स्पर्धामध्ये सर्वाधिक पारितोषिके प्राप्त केली होती. या वर्षीही सर्वाधिक पारितोषिके प्राप्त करून सांस्कृतिक क्षेत्रात रायगड जिल्ह्यात निर्विवाद वर्चस्व प्राप्त केले आहे.

सर्व पारितोषिक विजेते विद्यार्थी, महाविद्यालयाचा सांस्कृतिक चमू व सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. गीतिका तंवर व सांस्कृतिक समन्वयक गणेश जगताप यांचे या देदिप्यमान यशाप्रसंगी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरूणशेठ भगत, संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अनिल भगत, परेश ठाकूर, संस्थेचे सर्व कार्यकारी मंडळ सदस्य, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी.गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. पाटील सर्व प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर सेवकवर्ग यांनी विशेष अभिनंदन केले आहे. महाविद्यालयाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**पान १ वरून**

## गायिका मुग्धा गावकर यांच्या गायनाने पनवेलकर मंत्रमुग्ध

कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर, डॉ. गिरीश गुणे, अल्लादिया खाँसाहेब स्मृती समारोहाचे अध्यक्ष सुरेश खडके, भजनसम्राट हभप. निवृत्तीबुवा चौधरी, उस्ताद अजिम खान, हभप. नंदकुमार कर्वे, सिडको युनियन सेक्रेटरी जे. टी. पाटील, खारघर भाजपचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल, वसंतशेठ पाटील, किरण बापट, गायिका मधुरा सोहनी, मेघा इंगळे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, कार्यक्रमाचे संयोजक सांस्कृतिक सेलचे तालुकाध्यक्ष सुप्रसिद्ध गायक रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्यासह रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी गायिका मुग्धा गावकर यांनी, पटदिप रागामधील बडा ख्यालने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर पंडित जसराज यांचे प्रसिद्ध अभंग ओम नमो भगवते वासुदेवाय, या पंढरीचे सुख, ध्यान लागले रामाचे, हे अभंग सादर करून बाजे मुरलिया या प्रसिद्ध अभंगाने कार्यक्रमाचा समारोप केला. अतिशय सुंदरपणे झालेल्या कार्यक्रमात त्यांच्या गायनाने रंगत आणली, त्यामुळे दोन तास चाललेल्या या कार्यक्रमात रसिक आपल्या आसनावर कायम आसनस्थ होते. त्यांना हार्मो नियमवर वरद सोहनी, तबला साथ रामदास म्हात्रे, पखवाज मधुकर धोंगडे, तर गुरुदास कदम यांची टाळवर साथ दिली.

आयोजकांच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अभीष्टचिंतन करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे संयोजक सुप्रसिद्ध गायक रायगड भूषण पंडित उमेश चौधरी व सहकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

## लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलचे जिल्हास्तरीय स्पर्धेत यश

या स्पर्धेमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे शाळेतील ७वीमधील रोहन काळेल व जान्हवी धापटे यांनी बॉल थ्रो या क्रीडा प्रकारामध्ये प्रथम क्रमांक मिळवला. त्यामुळे या दोन्ही खेळाडूंची निवड ९ व १० ऑगस्टला उस्मानाबाद येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे.

या सर्व यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले आहे. या वेळी रयतचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, पब्लिक स्कूलच्या मुख्याध्यापिका अर्चना चव्हाण, क्रीडा शिक्षक सुरज पाटील, हर्षद पाटील उपस्थित होते.

**सांस्कृतिक कट्टा**

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल

**चल लव कर**

(७ ऑगस्ट, दु. ४.३० वा.)

# आमदार प्रशांत ठाकूर यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

## कामोठे येथे विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि. ६) कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत विद्यार्थ्यांना अमृत महोत्सवा निमित्त देशभक्ती जागवा, असा सल्ला दिला.

इयत्ता नववी व बारावीच्या ५३२ विद्यार्थ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला असून विद्यार्थ्यांनी डोळे तपासणी व दंत चिकित्सा करण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्था रायगड विभाग कामोठे इन्स्पेक्टर रोहिदास ठाकूर व पी.आर.ओ बाळासाहेब कारंडे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त विद्यालयाच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांनी पुष्पगुच्छ देऊन विद्यालयातर्फे शुभेच्छा दिल्या.

आरोग्य तपासणीसाठी कामोठे लायन्स क्लबचे डॉ. विनायक महाजन प्रेसिडेंट, आर. पी. पांडे, डायरेक्ट ललिता गुप्ता मॅडम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. तपासणी शिबिरात डॉ. शुभांगी पाटील, डॉ. संदेश देवगुडे, डॉ. कौशल्या बेहेरा, डॉ. अंकिता भोसले व डॉ. गोमती नादर यांचे विशेष सहकार्य लाभले, तसेच डॉ. नरेंद्र गुप्ता यांचे ही मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन व त्यांच्या हितासाठी या शिबिराचे आयोजन केले होते. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.



**पनवेल : अमृत महोत्सवानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'हर घर तिरंगा अभियान' सुरू केले आहे. त्या अनुषंगाने अल्पसंख्याक मोर्चाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त राष्ट्रध्वज देऊन अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश सचिव मन्सूर पटेल, पनवेल तालुका अध्यक्ष मोशीन कर्नाळकर, युवा नेते ॲड. इर्शाद शेख, मुदस्सर गोलंदाज, आफताब मस्ते आदींनी अभीष्टचिंतन केले. या वेळी आमदार महेश बालदी, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अभिषेक भोपी आदी उपस्थित होते.**

## पनवेलमध्ये बूस्टर डोस शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या आवाहनानुसार त्यांच्या वाढदिवसानिमित्त विविध लोकोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने माजी नगरसेविका रूचिता लोंढे यांनी कोरोना संकटापासून नागरिकांना सुरक्षा प्रदान करणाऱ्या बूस्टर डोस शिबिराचे आयोजन पनवेलमधील तथास्तू हॉलमध्ये केले होते.

या शिबिराचे उदघाटन पनवेल महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी या शिबिराला भेट देत आयोजक रूचिता लोंढे यांचे कौतुक करून कोरोना प्रतिबंधात्मक बूस्टर डोस घेण्याचे आवाहन केले. या शिबिराचा एकूण २२३ जणांनी लाभ घेतला. या लोकसेवेच्या कार्यक्रमातून उपस्थितांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे अभीष्टचिंतन केले.

या वेळी माजी नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, विक्रांत पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप ज्येष्ठ नेते नंदू पटवर्धन, भाजप शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा अध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेल अध्यक्ष अभिषेक पटवर्धन, संजय जैन, माजी नगरसेविका नीता माळी, महिला आघाडीच्या प्रदेश सरचिटणीस सुहासिनी केकाणे, अंजली इनामदार, सपना पाटील, अप्पा शिंदे, नंदा ओझे, अक्षया चितळे, प्रवीण मोहकर, अमित ओझे, गुरुनाथ लोंढे, मराठे मॅडम आदी उपस्थित होते.







**कळंबोली : भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त महिला मोर्चाच्या शहर अध्यक्ष मनिषा निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सेक्टर ११ मध्ये वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी शहर उपाध्यक्ष आशा देवी मल्हा, भाग्मुनी शाह, शोभा शिंदे देवता पाटील, सारिका कोळपे, रूपाली साळुंखे, रमेश पाटील, सावित्री तनवर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांना भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, उत्तर रायगड जिल्हा चिटणीस अशोक मोटे, कळंबोली शहर मंडळ सरचिटणीस दिलीप बीस्ट आदींनी शुभेच्छा दिल्या.**




**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयाच्या समोरील पोदी परिसरात उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळाच्या वतीने माणुसकीची भिंत उभारण्यात आली आहे. या भिंतीचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. माजी नगराध्यक्ष सुभाष भुजबळ, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, भाजपचे महिला मोर्चा शहर अध्यक्ष वर्षा नाईक, कामगार रवी नाईक, राकेश भुजबळ आदी या वेळी उपस्थित होते.**

## आसुडगाव येथे व्यवसाय कार्यालयाचे भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आसुडगाव येथे नव्याने शिव ॲडवायझरी सर्व्हीसेसचे कार्यालय सुरू झाले आहे. लक्ष्मण घोंगे यांनी सुरू केलेल्या या नवीन व्यवसायाच्या कार्यालयाचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. ६) झाले. या वेळी त्यांनी लक्ष्मण घोंगे यांना व्यवसायाच्या यशस्वी वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

आसुडगाव येथे लक्ष्मण घोंगे यांनी नव्याने शिव ॲडवायझरी सर्व्हीसेसचे कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयामध्ये होम लोन, जमीन विकत घेणे, रीयल इस्टेट, इश्योरंन्स, कार लोन, प्रॉपर्टी रजीस्ट्रेशन, सिडको ट्रांन्सफर यांसारखे व्यवहार करण्यात येणार आहे. या शिव ॲडवायझरी सर्व्हिसेसच्या कार्यालयाच्या उद्घाटनावेळी पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, ओबीसी मोर्चा जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, पं. स. सदस्य भुपेंद्र पाटील, लक्ष्मण रोहिदास घोंगे, प्रज्ञा लक्ष्मण घोंगे, उमेर उभारे, विकास कापने, सुयोग खेडेकर, सोमनाथ इचके आदी उपस्थित होते.

**पनवेल : भाजप कार्यकर्ते सुरदास पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, माजी नगरसेविका दर्शना भोईर, तसेच कविता पाटील, सपना पाटील आदी उपस्थित होते.**





## खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये फूड केमिस्ट्री स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे फूड केमिस्ट्री स्पर्धा शनिवारी (दि. ६) आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभागी होऊन आपल्या पाककलेचे प्रदर्शन करीत विविध पदार्थाचे सादरीकरण केले व त्यामुळे असणाऱ्या रसायनांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रूपाली नागरेकर यांनी केले व नीलम लोहकरे, प्रा. सुप्रिया बाबर यांनी सहकार्य केले.

या स्पर्धेचे परिक्षक म्हणून प्रा. मिनल माडवे व सफिना मुकादम यांनी काम पाहिले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी या स्पर्धेत उपस्थित राहून विद्यार्थी व विद्यार्थिनींनी प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर प्रा. महेश्वरी झिरपे (रसायनशास्त्र विभागप्रमुख) उपस्थित होत्या.

स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.



## कळंबोलीतील विविध नागरी समस्या मार्गी

### भाजपचा यशस्वी पाठपुरावा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली येथील सेक्टर १० मधील गीतांजली सोसायटी, आनंद मंगल सोसायटीमध्ये ग्रिनेज लाईनच्या संदर्भात तेथील रहिवाश्यांच्या तक्रारी सोडविण्यासाठी कळंबोली महिला मोर्चा अध्यक्ष मनिषा निकम यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका सफाई कर्मचाऱ्यांना सांगून कामास शनिवार (दि. ६)पासून सुरुवात करण्यात आली.

यासोबतच सेक्टर ११ व १०मधील सोसायटीच्या आवारात असलेला कचरा तसेच गार्डनमध्ये असलेला कचरा साफ करण्यासाठीही लेखी तक्रार देण्यात आली होती. तीन ते चार दिवस पाठपुरावा करून ते काम पूर्ण करण्यात आले. या वेळी कळंबोली मंडळ उपाध्यक्ष प्रियांका पवार, सरचिटणीस दुर्गा सहानी, उपाध्यक्ष आशा देवी मल्हा, भागमुनी शहा, सारिका कोळपे, शोभा शिंदे, रूपाली साळुंखे, देवता पाटील आदी उपस्थित होते.





**खारघर : माजी नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांच्या मागणीनुसार गुरुवारी सेक्टर ५ मधील अधिराज गार्डन सोसायटी व बेलपाडा गावातील रहिवाशांसाठी विशेष बूस्टर डोस, तसेच ज्या नागरिकांनी पहिला व दुसरा डोस घेतला नाही त्यांच्यासाठी डोस उपलब्ध करून देण्यात आला. तीनशेहून जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. या वेळी माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, भाजप शहर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, सोशल मीडिया सेलच्या शोभा मिश्रा यांनी विशेष मेहनत घेतली.**

# मार्क मोबिस भारताविषयी इतके आशावादी का आहेत?

***पन्नास अब्ज डॉलरचे व्यवस्थापन करणारे अमेरिकेतील मोबिस कॅपिटल पार्टनरचे फंड मॅनेजर मार्क मोबिस भारताच्या अर्थव्यवस्थेविषयी एवढे आशावादी का आहेत? त्याची काही कारणेच त्यांनी अलीकडे एका मुलाखतीत सांगितली. काय आहेत ती कारणे आणि भारतीय नागरिक त्यांच्याशी सहमत होतील का?***

## अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

रशियाने युक्रेनवर केलेला हल्ला आणि तैवानवर ताबा मिळविण्याच्या चीनच्या मनसुब्यामुळे जगात सध्या राजकीय आणि आर्थिक अस्थिरता वाढली आहे. तिकडे युक्रेनला बहुतांश युरोपीय देश आणि अमेरिकेचा तर इकडेही तैवानला अमेरिकेचा पाठिंबा आहे. भारत आणि चीनमधील सीमावाद जर जुनाच असून त्यावरून भारताच्या सीमेवर पुन्हा तणाव निर्माण होऊ लागला आहे. जेव्हा अमेरिका युक्रेनला पाठिंबा देते, तेव्हा रशिया आणि चीन जवळ येतात तसेच अमेरिका तैवानचा बचाव करते, तेव्हाही हे दोन्ही देश एकत्र येताना दिसतात. चीनच्या विस्तारवादावर रशिया प्रतिक्रिया देत नाही आणि चीनने पाकिस्तानसारख्या देशांना मदत केली, ते देशही चीन विरोधी भूमिका घेऊ शकत नाहीत. युरोपमध्ये चीनची विश्वासार्हता कमी होते आहे तर ऑस्ट्रेलियासारखे देश थेट चीनच्या विरोधात उभे रहाताना दिसत आहेत. याचा अर्थ असा की ‘जगाची फॅक्टरी’ म्हणविणाऱ्या चीनच्या विरोधात जाणाऱ्या देशांची संख्या वाढत चालली आहे. म्हणजे चीनशी त्या देशांचा असलेला व्यापार आगामी काळात कमी होण्याची शक्यता आहे. तो कमी झाला तर ती उणीव भरून काढण्याची क्षमता असलेला एकच देश समोर येतो, तो म्हणजे भारत!

### चीनची उणीव भरून काढणारा देश

भारताची उत्पादन क्षमता आज चीन इतकी प्रचंड नसली तरी भारतीय उद्योगांनी अलीकडे घेतलेली झेप आणि भारताची तरुण लोकसंख्या ही चीनची उणीव भरून काढू शकते. जगात अस्थिरता माजून भारताचा फायदा व्हावा, अशी अपेक्षा करणे, योग्य नाही. पण आजची परिस्थितीच तशी तयार झाली आहे. त्यामुळे जगात टोकाची युद्धखोरी वाढली नाहीतर जगातील बदलत्या परिस्थितीचा भारत लाभधारक आहे, एवढे नक्की! आजच्या य ा



परिस्थितीकडे केवळ आर्थिक अंगाने पाहिले तर भारताचा आर्थिक फायदा होताना दिसतो आहे. त्यामुळे जगाचे लक्ष पुन्हा भारताकडे लागले तर आश्चर्य वाटण्याचे काही कारण नाही. अमेरिकेतील मोबिस कॅपिटल पार्टनरचे फंड मॅनेजर मार्क मोबिस यांनी अलीकडे एका मुलाखतीत भारताच्या या सर्व क्षमतांचा आवर्जून उल्लेख केला आहे. तब्बल ५० अब्ज डॉलरचे व्यवस्थापन करणारे मार्क यांच्या मताला जगात महत्व आहे. भारताची अर्थव्यवस्था आज कशी आहे, याविषयी भारतात अनेक टोकाची मते पाहायला मिळतात. या पार्श्वभूमीवर अमेरिकन गुंतवणूक तज्ञाला भारताविषयी काय वाटते, हे जाणून घेतले पाहिजे आणि त्यातील काही



भारतात खरोखरच दिसते का, याचाही विचार केला पाहिजे.

### मोबिस भारताकडे कसे पाहतात?

आधी मार्क मोबिस यांनी भारताविषयी काय म्हटले, ते पाहू. त्यातील महत्त्वाचे काही मुद्दे असे –१. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी म्हणजे आयएमएफने भारताचा विकासदर ही दोन वर्षे जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक असेल, असे म्हटले आहे. कारण भारतामध्ये महामार्ग, रेल्वेमार्ग आणि इतरपायाभूत सुविधांची प्रचंड कामे सध्या सुरु आहेत. २. नळाने पाणी पुरवठा असणारी घरे आणि गॅसचा वाढत चाललेला वापरही जीवनमान सुधारत असल्याची लक्षणे आहेत. ३. डिजिटल व्यवहार आणि बँकिंगमुळे आर्थिक समावेशन वेगाने वाढत असून त्याला मोबाईल फोन आणि इंटरनेटनेटने गती दिली आहे. ४. डिजिटलायझेशनचा फायदा जनता, सरकारला तर होतो आहेच, पण जेव्हा रुपयाची घसरण रोखण्याची वेळ आली तेव्हा भारतीय रिझर्व बँकेलाही त्याचा चांगलाच फायदा झाला आहे. त्यामुळेच रुपयाची घसरण इतर देशांच्या तुलनेने आवाक्यात आहेत. ५. जगातील नकारात्मक वातावरणामुळे गेले वर्षभर परकीय गुंतवणूकदार भारतातील गुंतवणूक काढून घेत असले तरी याच काळात भारताची निर्यात विक्रमी वाढली आहे.चीनला पर्याय म्हणून जग भारताकडे पाहत असल्याची ही सुरवात आहे. शिवाय भारताची माहिती तंत्रज्ञानातील निर्यात पूर्वीसारखीच कायम टिकून आहे. ६. भारतातील वैविध्य तसेच बदलत्या आर्थिक साखळ्यांमुळे वस्तूंची मागणी कायम रहाते. जेथे वैविध्य नाही, अशा देशांना हा फायदा मिळत नाही. ७. मध्य उत्पन्न गटातील कुटुंबांचे प्रमाण भारतात सातत्याने वाढत आहे. त्यामुळे त्यांचा खाण्यापिण्यावरील खर्च वाढत चालला आहे. आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजनावरील खर्च तर त्यापेक्षाही वेगाने वाढतो आहे. ८. अपुरी वीज, वाहतुकीच्या सोयींचा अभाव आणि आर्थिक समावेशनाअभावी ग्रामीण भारतातील ग्राहकशक्तीचा अर्थकारणात वाटा इतकी वर्षे कमी पडत होता, पण आता वीज, वाहतूक आणि बँकिंगमधील वाढीमुळे त्यांची ग्राहकशक्ती वाढली आहे. तसेच इंटरनेटमुळे त्यांना मिळत असलेली माहिती शहरी ग्राहकाच्या बरोबरीची होऊ लागली आहे. ९. भारत हा मोठा ग्राहक असलेला देश आहे, त्यामुळे भारतातील काही कंपन्यांचा विस्तार वेगाने होत असून त्यातील काही कंपन्यांची जगात ओळख होऊ लागली आहे. त्या अर्थातच लिस्टेड कंपन्या आहेत. त्यामुळे भारतीय भांडवली बाजारात इतर देशातील गुंतवणूकदारांना रस निर्माण होऊ लागला आहे. १०. अनिवासी भारतीयांची संख्या मोठी आहे तसेच ते उच्च मध्यमवर्गीय गटातील आहेत. त्यांना भारतात गुंतवणुकीसाठी सरकारकडून प्रोत्साहन मिळत असल्याने रिमिटन्स सातत्याने वाढतो आहे. भांडवली बाजाराचे संपूर्ण डिजिटलायझेशन आणि त्यामुळे वाढलेला विश्वास हेही त्याचे एक कारण आहे.

### आजची भारतीय अर्थव्यवस्था

*ज्या गोष्टी कोणाही जागरूक भारतीय नागरिकाला माहीत आहेत, त्याच गोष्टी मार्क मोबिस यांनी सांगितल्या आहेत, हे यावरून आपल्या लक्षात येईल. मात्र अमेरिकेतल्या एका मोठ्या गुंतवणूकदाराला भारताविषयी काय वाटते, याला महत्व आहेच. भारताची भूमिका आणि आर्थिक विकास याला जगाच्या व्यासपीठावर अधिक महत्व प्राप्त होईल, असेही त्यांनी म्हटले आहे. प्रत्यक्षात ती लक्षणे भारतीय अर्थव्यवस्थेत दिसू लागली आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळे जगभर महागाई वाढल्याने आणि त्याचे परिणाम भारतातही होणे अपरिहार्य असल्याने महागाईचा मुद्दा थोडा बाजूला ठेवून आज भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहिल्यास त्याची प्रचीती येते. कोरोनाच्या धक्क्यातून वेगाने बाहेर येत असलेली अर्थव्यवस्था, भारताच्या परकीय चलनाच्या साठ्यात पुन्हा होत असलेली वाढ, शेअर बाजारातील कंपन्यांचे वाढीव नफ्याचे आकडे, रुपयाची रोखली गेलेली घसरण, सरकारच्या तिजोरीत कररूपाने चांगला निधी जमा होत असल्याने वाढलेला भांडवली खर्च, संरक्षणासह अनेक क्षेत्रात निर्यातीला आलेला वेग, अन्नधान्याची, फळांची आणि भाज्यांची मुबलकता, हवाई क्षेत्राचा वेगाने होत असलेला विस्तार तसेच मोटारी आणि ट्रॅक्टरच्या विक्रीचे वाढीव आकडे.. ही सर्व आकडेवारी पुरेशी बोलकी आहे.*

# पेनी स्टॉक्सचे आकर्षण ही घोडचूकच का आहे?

***कमी भाव असणाऱ्या कंपन्यांची नोंदणी रद्द तरी होऊ शकते किंवा त्यांचे भाव काही पैशातही येवू शकतात. कारण त्या कंपन्यांमध्ये व्यवस्थापनाचे प्रश्न येतात. याउलट अगदी तळाशी घुटमळणाऱ्या बाजारात एखाद्या चांगल्या म्हणजेच चांगले फंडामेंटल्स असणाऱ्या कंपनीचे शेअर्स तुलनेने कमी भावात मिळत असतील तर ती संधी सोडता कामा नये, मग पदरात पडणाऱ्या शेअर्सची संख्या ही भले कमी असो.***



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

अनेक ओळखी पाळखीचे लोक मला स्वस्तातील शेअर्सबद्दल विचारणा करतात. त्यांचा रोख हा पेनी स्टॉक्सकडे असतो परंतु बाजार महाग असताना देखील कमी भाव असणाऱ्या कंपन्या यास्वस्त म्हणजे कमी मूल्याच्याच म्हणजे निकृष्ट असू शकतात. अशा शेअर्समध्ये, गुंतवणूक करण्यासाठी असलेली रक्कम गुंतवणे, ही घोडचूक ठरू शकते. अशा लोकांना वाटते की भाव कमी आहे म्हणजे त्यात जास्त शेअर्स खरेदी करता येतील. परंतु अशा गुंतवणूकदारांनी हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे की अशा कंपन्यांच्या बाबतीत कधीही लाखाचे बारा हजार देखील होऊ शकतात, काय खात्री असते की, कमी भाव असणाऱ्या कंपन्यांची नोंदणी रद्द होणार नाही किंवा त्यांचे भाव काही पैशात येणार नाहीत? याउलट अगदी तळाशी घुटमळणाऱ्या बाजारात एखाद्या चांगल्या म्हणजेच चांगले फंडामेंटल्स असणाऱ्या कंपनीचे शेअर्स तुलनेने कमी भावात मिळत असतील तर ती संधी सोडता कामा नये मग पदरात पडणाऱ्या शेअर्सची संख्या ही भले कमी असो.

उदा. ऑक्टोबर २०१८मध्ये जेव्हा बाजार पडला तेव्हा आरकॉमचा १ शेअर दहा रुपयांना मिळत होता तर इंडिगो एअरलाईन्सचा १ शेअर ७०० रुपयांना तर कोटक बँकेचा १००० ला, एशियन पेंट्सचा ११२० रुपयांना, तर बजाज फायनान्सचा २००० रुपयांस मिळत होता. एखाद्या व्यक्तीने जर दहा हजार रुपये कोणत्याही एकाच कंपनीच्या शेअर्समध्ये गुंतवायचे ठरवले असते तर त्याला आरकॉमचे १००० शेअर्स घेता आले असते तर इंडिगोचे १४, कोटक बँकेचे १०, एशियन पेंट्सचे ८, तर बजाज फायनान्सचे केवळ पाचच. परंतु आज त्याच दहा हजार रुपयांची किंमत एकीकडे असती ५००० रु. तर दुसरीकडे अनुक्रमे रु. २९,०२०, १८,३४०, २७,७९० व ३६,५२० असली असती. (दि. ५ , शुक्रवार अखेर) त्यामुळे भाव कमी आहे म्हणून शेअर्सची खरेदी करण्यापेक्षा तीच उत्तम कशी ठरेल याचा विचार करावा व योग्य संधीची वाट पहावी. प्रत्येक गोष्टीची एक अंगभूत किंमत किंवा एक आंतरिक मूल्य असते (Intrinsic Value). मागील आठवड्यात




डीमार्टमध्ये खरेदी करताना ओले खोबरे व चॉकलेट असे कॉम्बिनेशन असलले बाऊंटीचे चॉकलेट हे एकावर एक मोफत मिळत होते आणि मी ते लगेच खरेदी केले अर्थातच एक्स्पायरी डेट, पॅकिंग, इ. गोष्टी तपासूनच, कारण ते चॉकलेट त्यापेक्षा कमी किंमतीत न मिळण्याची शक्यता. दुसरे उदाहरण बाटाचे घेता येईल. जेन्युईन लेदर शूजचे एक बेसिक मूल्य बहुतेक प्रत्येक पुरुषास माहीत असते तरी काही लोकांना तसे शूज अगदी किरकोळ भावात हवे असतात जे केवळ जुन्या बाजारातच मिळू शकतात परंतु ते किती टिकतील याची शाश्वती नसते हे देखील समजून घ्यायला हवे.आपले हित कशात आहे यापेक्षा काय स्वस्त मिळतेय याबाबत मानवी स्वभाव जास्त चिकित्सक होताना दिसतो. अलीकडच्या पडझडीतसुद्धा बाजाराचे निर्देशांक ऐतिहासिक सरासरीच्या तुलनेत अजूनही किंचित अधिमूल्यांकित आहेत परंतु ऐतिहासिक सरासरीच्या तुलनेत अशा बऱ्याच कंपन्या सध्या आकर्षक मूल्यांकनावर उपलब्ध आहेत.

बहुतेक गुंतवणूकदारांचा लाडका असलेला रेश्यो म्हणजे पीई रेश्यो. हा रेश्यो, कंपनीचे प्रति शेअर उत्पन्न व त्या कंपनीच्या एका शेअरचा भाव यामधील गुणोत्तर दाखवतो म्हणजे एका कंपनीचे प्रति शेअर उत्पन्न जर २५ असेल व त्याचा भाव जर १०० असेल तर त्याचा पीई रेश्यो हा १००/२५ म्हणजे चार येतो. प्रचलित बाजार भावात त्या अमूक एका कंपनीचा शेअर किती पट महाग आहे याचा अंदाज या रेश्योवरून येतो. दुसऱ्या भाषेत, एक रुपया कमावण्यासाठी किती रुपये लावावे लागतील याचे गणित हा पीई रेश्यो मांडत असतो. ५ वर्षांची ऐतिहासिक पी/ई सरासरी हा कोणत्याही स्टॉकमध्ये गुंतवणूक करण्यापूर्वी विचार करण्याच्या मुख्य निकषांपैकी एक असू असते. तथापि, ’पडती सुरी पकडायचा प्रयत्न करू नये’ या चायनीज म्हणीनुसार आणि कंपन्यांच्या उद्योगांची गतिशीलता व इतर मूलभूत बाबी समजून घेण्यासाठी अधिक संशोधन करणं आवश्यक आहे. गुंतवणूकीचा सुवर्ण नियम म्हणजे कंपन्यांच्या आंतरिक मूल्याच्या तुलनेत आकर्षक स्तरावर व्यवहार करणाऱ्या शेअर्समध्ये पैसे लावणे, ज्याद्वारे गुंतवणूकदारांना दीर्घ अवधीत त्याचा उत्तम फायदा होऊ शकतो.

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३०

### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. पुढीलपैकी कोणती उर्जा कंपनी सरकारी मालकीची नाही?**
*ई.* टाटा पॉवर

**प्रश्न क्र. २. आपण कर्जदार असाल तर कोणते कर्ज आधी फेडणे फायद्याचे आहे?**
*इ.* क्रेडीट कार्डवर घेतलेले कर्ज

**प्रश्न क्र. ३. आकाश या नव्याने येणाऱ्या विमान कंपनीच्या स्थापनेत कोणी पुढाकार घेतला आहे?**
*आ.* राकेश झुनझुनवाला

**अर्थसाक्षर स्पर्धा ३०च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३०साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३१

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. पुढीलपैकी कोणत्या सरकारी तेल कंपनीचे बाजारमूल्य सर्वात अधिक आहे?**
*अ.* इंडियन ऑईल *आ.* बीपीसीएल *इ.* ओएनजीसी *ई.* एचपीसीएल

**२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
*अ.* जिओ *आ.* भारती एअरटेल
*इ.* व्होडाफोन आयडिया *ई.* टाटा टेलिकम्युनिकेशन

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
*अ.* एचडीएफसी बँक *आ.* आयसीआयसीआय बँक
*इ.* कोटक महिंद्रा बँक *ई.* स्टेट बँक ऑफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# म्हसळ्यात खैराच्या लाकडांची वाहतूक करणारा टेम्पो जप्त

## ▪ चालक जेरबंद; कणघर फाटा येथे वन विभागाची कामगिरी


**म्हसळा : प्रातिनिधी**

वन विभागाच्या पथकाने शुक्रवारी (दि. ५) श्रीवर्धन–म्हसळा–गोरेगांव या राज्यमार्गावरील कणघर फाटा येथे खैराच्या लाकडांची चोराटी वाहतूक करणारा टेम्पो ताब्यात घेतला असून, त्याच्या चालकाला अटक केली आहे.

म्हसळा तालुक्यात वनविभागाचे क्षेत्र मोठ आहे, या क्षेत्रात फार जुनी खैराची लागवड करण्यात आली होती. अलिकडच्या काळात तालुक्यातून खैराच्या लाकडांची मोठ्या प्रमाणात चोरटी तोड आणि वाहतूक होत असल्याचे परिक्षेत्र वन आधिकारी संजय पांढरकामे यांच्या लक्षात येताच त्यांनी पूर्ण तालुक्यात 'ऑपरेशन खैर' सुरु केले आहे. त्यानुसार शुक्रवारी वनपाल दीपक शिंदे (मांदाटणे), वनरक्षक प्रियंका चव्हाण (खामगाव)वनरक्षक अमोल सोनार यांच्या पथकाला श्रीवर्धन– म्हसळा– गोरेगांव राज्य मार्गावरील कणघर फाटा येथे महिंद्रा पिकअप टेम्पो (एमएच–०२,वायए–३६८९) अवैध खैर तस्करी करताना सापडला. त्याचवेळी अन्य एका गस्ती पॉंईटवरून परिक्षेत्र वन आधिकारी संजय पांढरकामे, लक्ष्मण इंगोले, अतुल आहिरे, सतीश खरात, भिमराव सुर्यतळ यांचे पथक घटनास्थळी पोहचले. त्यांनी टेम्पो चालक फरान दाऊद चिलवान (रा. लिपणी वावे, ता. म्हसळा) याला ताब्यात घेऊन टेम्पोमधील सुमारे ६३०९रुपये किमतीचे खैराचे १४६ सोलीव नग जप्त करून देहेन विक्री आगार येथे जमा केले व टेम्पो जप्त केला.

आरोपी फरान दाऊद चिलवान याला श्रीवर्धन न्यायालयात हजर केले असता त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी मिळाली.

(छाया : संजय खांबेटे)



**खैराच्या झाडाच्या अतिजून, लालसर मध्यकाष्ठापासून पाण्यात उकळवून काढलेल्या पदार्थास कात (काथ) म्हणतात. मुखविकार, डायरिया यावर औषध म्हणून कात वापरतात. तसेच तोंडाला चव आणण्यासाठी, पचनक्रिया, दाताचे तसेच त्वचेचे आरोग्य सुधारण्यासाठी काताचा वापर करतात. अतिसार, आमांश, पोटात दुखणे इत्यादींसाठी काताची पूड अणि मध घेतात. अधिक वेळा लघवी होत असल्यास कातपूड वापरतात. काताचा उपयोग जखम लवकर भरून होण्यासाठी होतो.**
**–महमद अली उर्फ भाई दफेदार, आयुर्वेद अभ्यासक, म्हसळा**

# आसरे येथील इसमाची आत्महत्या

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील आसरे येथील अनंत ादेवराम चव्हाण (वय ४६) यांनी शुक्रवारी (दि. ५) मानसिक तणावातून शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

अनंता चव्हाण हे गुरुवारी सकाळी त्यांची इको गाडी घेऊन घरातून निघाले होते. ते घरी परत आले नाही, म्हणून शुक्रवारी सकाळी फिर्यादी नथुराम चव्हाण यांनी गावातील काही तरुणांसह परिसरात शोध घेतला, त्यावेळी अनंता चव्हाण याच्या ताब्यातील इको गाड़ी शेताच्याकड़ेला दिसली. पायवाटेने खोपटीचा माळ येथे पोहचल्यावर झाड़ाच्या फांदीला अनंता चव्हाण याने गळफास घेतल्याचे आढळले. या प्रकरणी पाली पोलीस निरीक्षक विश्वजीत काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाली अधिक तपास सुरू आहे.

# गळफास घेऊन मुलीची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

शहरानजीक चांभारखिंड या ठिकाणी गुरूवारी (दि. ४) एका २०वर्षीय तरुणीने आपल्या राहत्या घरी साडीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्त्या केल्याची घटना घडली आहे.

महाड शहरानजीक चांभारखिंड येथील जागृती सुनील महाडीक (वय २०) या तरुणीने गुरुवारी संध्याकाळी अज्ञात कारणावरून स्वतःच्या राहत्या घरी साडीच्या सहाय्याने गळफास लावून आत्महत्त्या केली. या बाबत आई भावना सुनील महाडीक यांनी महाड शहर पोलीस ठाण्यात रीतसर खबर दिल्याने अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मूळ मालक यांच्याकडून कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे–लोणिवली, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १६५ | २६ | ०–१२–१०<br>पो.ख. ०–३३–९०<br>एकूण ०–४६–०० | ०.१२ | श्री. हाशा रामा बरवे. |
| १५८ | १ | ०–७४–८०<br>०–३१–२०<br>पो.ख. ०–२८–८०<br>एकूण ०–६०–०० | ८.७५<br>३.६५ | श्री. हाशा रामा बरवे.<br>श्री. विठु शामा बरवे |

वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दिनांक :– ०६/०८/२०२२**

**सही/–**
**ॲड. एस. के. राणे**
**पत्ता : ऑफीस नं. १२३, पहिला मजला, म्युन्सीपल कॉम्प्लेक्स, भाजी मार्केटजवळ, पनवेल, जि. रायगड, मो.नं. ९८१९८६९२१२**


# पावात सापडली उंदरांची विष्ठा, नागोठणे शहरातील प्रकार

**नागोठणे : प्रतिनिधी**

येथील किंग बेकरीमधील पावामध्ये गुरुवारी (दि. ४) उंदरांची विष्ठा (लेंड्या) सापडली असून, पेण येथील अन्न व औषध प्रशासनाने सदर बेकरी बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.

पाली–कुंभारशेत येथील सचिन डोबले हे गुरुवारी एका हॉटेलमध्ये भाजीपावच्या पार्सलची ऑर्डर केली. या पार्सलमधील पावामध्ये डोबले यांना काहीतरी काळे दिसले. ते निरखून पाहिल्यानंतर ती उंदरांची लेंडी असल्याचे स्पष्ट झाले. त्याबाबत हॉटेल मालकाला विचारणा केली असता, त्याने सदरील पाव फेरीवाल्या मार्फत किंग बेकरीमधून आणल्याचे सांगितले. डोबले यांनी सदरील घटनेची नागोठणे पोलीस ठाणे आणि ग्रामपंचायत तसेच पेण येथील अन्न व औषध प्रशासनाकडे रीतसर तक्रार केली. अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी सचिन आढाव व विक्रम निकम हे आपल्या सहकार्यांसह बेकरीमध्ये तात्काळ दाखल झाले. त्यांनी पंचासह सदरील ठिकाणची पाहणी केली. बेकरीमध्ये सर्वत्र अस्वच्छता व कायदा २००६मधील तरतूदींचे उल्लंघन होत असल्याचे त्यांना आढळले. त्यामुळे अन्न व औषध



(छाया : राज वैशंपायन)

प्रशासनाने तात्काळ किंग बेकरी बंद करण्याचे निर्देश दिले.

**नागोठणे येथील किंग बेकरीमध्ये सर्वत्र अस्वच्छता आढळून आली. तसेच अन्नसुरक्षा व मानवी कायदा २००६ मधील तरतुदींचे उल्लंघन केले असल्यामुळे बेकरी व्यवसाय बंद करण्याचे निर्देश दिले आहेत.**
**–सचिन आढाव, अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन–पेण**

**किंग बेकरीमधील पावामध्ये उंदराची विष्ठा सापडल्याची तक्रार प्राप्त होताच बेकरीचे शेखजाद खुर्शिद अन्सारी व नूर सबा यांना सर्व परवाने, कागदपत्रे सादर करण्याबाबत नोटीस दिली आहे.**
**–मोहन दिवकर, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत नागोठणे**

# माथेरानमध्ये वक्तृत्व स्पर्धा

**माथेरान, कर्जत : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत माथेरानमधील वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेत शुक्रवारी (दि. ५) वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते, त्यास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

माथेरान नगर परिषदेच्या प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि मार्गदर्शनाखाली ही वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात गव्हाणकर एज्युकेशन ट्रस्ट या शाळेतील विद्यार्थ्यांसह वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी दोन्ही शाळांचे मुख्याध्यापक कल्पना पाटील व लक्ष्मण ढेबे, शिक्षक दिलीप आहिरे, सचिन भोईर, अनिश पाटील, संतोष चाटसे, संघपाल वाठोरे, दिनेश बागवे, विदुला गोसावी यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.



(छाया : भूषण सातपुते)


## जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

**(सोसायटी ॲक्ट १८६०–क्र.४५/९२ मुंबई विश्वस्त अधिनियम १९५०–क्र.एफ१६१७)**

**वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना**
**(फक्त सभासदांसाठी)**

प्रति,
मा. सभासद

महोदय,

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची बत्तिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दिनांक १२ सप्टेंबर २०२२ रोजी सायंकाळी ४.०० वाजता संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्टस, कॉमर्स अ‍ॅन्ड सायन्स कॉलेज (ऑटोनॉमस) रूम नं.३, स्किल डेव्हलपमेंट सेंटर, प्लॉट नं.१, सेक्टर ११, खांदा कॉलनी, नवीन पनवेल येथे खालील कामांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास नियोजित वेळेच्या अर्ध्या तासानंतर तीच सभा त्याच ठिकाणी त्याच कामाचा विचार करण्यासाठी भरविण्यात येईल व अशा पुन्हा भरलेल्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

तरी आपण या सभेस अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील कामे**

१. ३० डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज वृत्त वाचून कायम करणे.
२. मागील सर्वसाधारण सभेपासून आजपर्यंत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयांना व केलेल्या कार्यवाहीला मंजूरी देणे.
३. ज.भ.शि.प्र. संस्थेचे २०२१–२०२२ सालचे हिशोब तपासनिसांनी प्रमाणित केलेले जमाखर्च व ताळेबंद व हिशोब तपासनिसांचा अहवाल वाचून मंजूर करणे.
४. सन २०२२–२०२३ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.
५. सन २०२२–२०२३ सालाकरीता हिशोब तपासनिसांची नेमणूक करणे.
६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

**सही/–**
**मा. श्री. अरूण जगन्नाथ भगत**
**अध्यक्ष**
**जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल.**

**ठिकाण :– नवीन पनवेल**
**दिनांक :– ०७ ऑगस्ट २०२२**

टीप :– १. मा. सदस्यांना काही सूचना करावयाच्या असतील अगर प्रश्न विचारावयाचे असतील तर ते लेखी स्वरूपात सभेच्या ७ दिवस अगोदर पोहोचतील असे पाठवावेत. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा अगर सूचनांचा विचार करण्यात येणार नाही.
२. ज्या सभासदांची निवासस्थाने बदलली असतील त्यांनी आपला बदललेला पत्रव्यवहाराचा पत्ता संस्थेच्या कार्यालयात कळवावा.



## ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद ता. पनवेल, जि. रायगड

**(महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९)**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमुद केलेल्या मालमत्तांचे पालीदेवद ग्रामपंचायतीकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालीलप्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

**जुलै २०२२**

| अ.क्र. | मालमत्ता घेणाऱ्याचे नाव | मालमत्ता देणाऱ्याचे नाव | मालमत्ता वर्णन | दस्तऐवज अनुक्रमांक | दस्तऐवज दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | तेजस्वी सुशिल पाटील, सुशिल वसंत पाटील | म्हतु शिवा घोलप | सदनिका क्र. ०४, तळ मजला, बि.नं.बी १, बी विंग, स्वानंदभूमी को.हौ.सो. मौजे पालीदेवद | पवल१–३३६५–२०२२ | २२/०३/२०२२ |
| २ | शशिकांत माणिक निकम, अविनाश माणिक निकम | हेमंत विलास बावकर | सदनिका क्र. बी ००१, तळ मजला, समृद्धभूमी को.हौ.सो. मौजे पालीदेवद | पवल३–१५७३०–२०२१ | ०७/१०/२०२१ |
| ३ | सशांत सहदेव साळसकर, अनया सशांत साळसकर | मे. एन.सी. डेव्हलपर्स तर्फे विनोद तुकाराम चांदे | सदनिका क्र. १०२, पहिला मजला, बी विंग, सद्गुरु रेसिडेन्सी, मौजे शिलोत्तर रायचूर. | पवल३–१११४१६०–२०२० | ०२/१२/२०२० |
| ४ | सतीश शिवराम कर्डक, योगिता सतीश कर्डक | अशोक अमर चावला | सदनिका क्र. ००२, तळ मजला, ई विंग, बि.नं. २, कार्तिक्य पार्क को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. | पवल३–१३९८२०–२०२१ | ०३/०९/२०२१ |
| ५ | मनोज कुमार, संगिता कुमारी | कंचन घनशामदास अडनानी, घनशाम भोजामल अडनानी | सदनिका क्र. ९, दुसरा मजला, बि.नं.जी. ४, ओम साई गोदावरी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. | पवल५–१००९४–२०२२ | १७/०६/२०२२ |
| ६ | दिलीप मारूती बोंबे, प्रियांका दिलीप बोंबे | रजनीश विनोद गुप्ता, विनोद मदनमोहन गुप्ता | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, श्रद्धा संकुल को.हौ.सो., मौजे पालीदेवद. | पवल५–२३३–२०२२ | ०६/०१/२०२२ |
| ७ | राजेंद्र रामचंद्र मनोरे | रमेश सुकदेव निरभवणे | सदनिका क्र. ०३, तळ मजला, बि.नं. बी ४, आविष्कार को.हौ.सो., युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद. | पवल२–९८७८–२०२२ | १२/०७/२०२२ |
| ८ | भाग्यश्री रत्नदीप जाधव, रत्नदीप तुकाराम जाधव | निरंजन सिंह | सदनिका क्र. २०३, दुसरा मजला, समृद्धभूमी को.हौ.सो., मौजे पालीदेवद. | पवल३–१६३५३–२०२१ | १८/१०/२०२१ |
| ९ | अजितकुमार सुनामनी सामल, मंदाकिनी अजित सामल | व्ही. एस. भिसे | सदनिका क्र. ३, तळ मजला, बि.नं. जी. २, ए विंग, वसुंधरा को.हौ.सो., मौजे पालीदेवद. | पवल३–७०५६३–२०२२ | २०/०४/२०२२ |
| १० | अलका कारभारी गायकवाड | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स तर्फे रामानुज शर्मा | सदनिका क्र. ४०४, चौथा मजला, स्वस्तिक रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद. | पवल२–३२२७–२०२२ | ०४/०३/२०२२ |
| ११ | पूनम नवनीत गायकवाड | मे. गिरीजा कन्स्ट्रक्शन्स तर्फे रामानुज शर्मा | सदनिका क्र. ४०४, चौथा मजला, स्वस्तिक रेसिडेन्सी, मौजे पालीदेवद. | पवल२–२७९२–२०२२ | २४/०२/२०२२ |
| १२ | जुबी थॉमस | पांडुरंग शंकर म्हसकर यांचे कु.मु. म्हणून पंढरीनाथ लक्ष्मण म्हात्रे | सदनिका क्र. ८, पहिला मजला, बी विंग, संतकृपा, मौजे पालीदेवद. | पवल४–६२६७–२०१४ | १६/०६/२०१४ |
| १३ | सुनिता दशरथ नागोटकर, परेश दशरथ नागोटकर, रोशन दशरथ नागोटकर | मे. स्वामी समर्थ बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार निलीमा नात्ती | सदनिका क्र. ८, पहिला मजला, बी विंग, संतकृपा, मौजे पालीदेवद. | पवल३–१७९४१–२०२१ | १२/११/२०२१ |
| १४ | संदेश मारुती गावंड, कविता संदेश गावंड | शेख अफझलुनिस्सा मोहम्मद जमालुद्दीन तर्फे परविन नूर मोहम्मद | सदनिका क्र. ६, पहिला मजला, सरस्वती को.हौ.सो., मौजे पालीदेवद. | पवल२–७८२९–२०१६ | ०५/०७/२०१६ |
| १५ | महमूद जमिर अहमद शाह, जिन्नत फातिमा महमूद शाह | माऊली प्रसाद कन्स्ट्रक्शन तर्फे शामल चंद्रकांत पोपेटा | सदनिका क्र. २०४, दुसरा मजला, शुभारंभ को.हौ.सो., मौजे पालीदेवद. | पवल१–१४१८–२०२० | १२/०२/२०२२ |
| १६ | शबाना फिरोज गवाणकर | मे. बालाजी सिम्फोनी तर्फे विनय अग्रवाल | सदनिका क्र. जे. ७०५, सातवा मजला, जे विंग, बालाजी सिम्फोनी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. | पवल२–११५५६–२०२० | ११/१२/२०२० |
| १७ | विद्यामोल जी., शिबुकुट्टन के. पी. | मनोज फिलीप | सदनिका क्र. सी.१३, पहिला मजला, श्री सावननगरी को.हौ.सो., मौजे पालीदेवद. | पवल२–१४०९७–२०२१ | १२/१०/२०२१ |
| १८ | जितेंद्र कुमार सिंह, सरोज देवी | श्रीनिवासन नायडू, सरोज देवी | सदनिका क्र. ०३, तळ मजला, बि.नं. जी १, सर्वोदय को.हौ.सो., युगांतक हौसिंग कॉम्प्लेक्स, मौजे पालीदेवद. | पवल१–१२६४–२०२२ | ०१/०२/२०२२ |
| १९ | उमेश रामचंद्र भगत, सुविधा उमेश भगत | भारती संतोष उरणकर | सदनिका क्र. ३०४, तिसरा मजला, जनलक्ष्मी को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. | पवल२–८०००–२०२२ | ०३/०६/२०२२ |
| २० | लक्ष्मणसिंह शैलसिंह राठोड | मे. जय संतोषी माता डेव्हलपर्स तर्फे संतोष बळवंत नाईकडे | सदनिका क्र. ४०३, चौथा मजला, वैष्णवी आशिर्वाद को.हौ.सो., मौजे शिलोत्तर रायचूर. | पवल२–३६७२–२०२० | १३/०३/२०२० |
| २१ | राजबहादूर शिवपूजन प्रजापती, प्रदीप आर. प्रजापती | मे. स्टार इंटरप्रायजेस तर्फे भागीदार विलास शंकर लोंढे | सदनिका क्र. १०२, पहिला मजला, शितल व्हिला, मौजे पालीदेवद. | पवल४–१५६८६–२०१५ | ११/१२/२०१५ |
| २२ | रणजीत कांतीलाल जैन | मुकेश ट्रेडर्स प्रोप्रायटर कांतीलाल एस. जैन | घर मिळकत क्र. २८९/३, पालीदेवद | सब ट्रेजरी ऑफिसर पेण यांचे अ.नं. ४०६७ चे प्रतिज्ञापत्र | १३/०७/२०२२ |


वरीलबाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पालीदेवद ग्रामपंचायत कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचाराधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीच्या प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरीलप्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १५९ कलम १२९ नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.


**सही/–**
**(सुदिन धनाजी पाटील)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/–**
**(सौ. योगिता राजेश पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पालीदेवद**
**ता. पनवेल. जि. रायगड**

# वाचन म्हणजे जणू स्वत:चा शोधच!

कालानुरूप, व्यक्तीनुरूप लिहिण्याची भाषा, शैली, विचारांचे वेगळेपण त्या लिखाणातून डोकावत असते. काही पटत, काही पटत नाही. पण तरीही आपण वाचतच राहतो. व्यक्त होणारे व्यक्त होत राहतात. म्हणून वाचणारे आहेत तो पर्यंत लिहिणारे लिहित राहतील आणि लिहिते आहेत, तोपर्यंत वाचणारे वाचत राहतील. इतर माध्यमांची कितीही आक्रमण झाली तरीही पुस्तके येत राहतील. ती आपली मित्र, गुरू, मार्गदर्शक असतात. रोज बरेच काही नवे येत असते. तरी जुने मनात ताजे असते, स्वत:चे अस्तित्व जागवत. वाचन म्हणजे जणू स्वत:चा शोधच असतो आणि आत्मशोध ही अपरिहार्य अशी अन् बहुधा अंतिम अशी मनाची अवस्था आहे. माणसाला त्यामुळे, आज ना उद्या वाचनाकडे वळावे लागते. वाचन माणसाला समृद्ध करते. दिलासा देते-कदाचित जगणे सुसह्य करते. नामवंत साहित्यिकांकडून या उत्तम साहित्यकृतींची या सदरातून आपल्याला ओळख करून देत आहोत...





सौ. अरूणा अजित भागवत, साहित्यिका

वाचाल तर वाचाल
साहित्यिकांची आवडती पुस्तके

## झुळूक -मंगला गोडबोले

मंगला गोडबोले या सुप्रसिद्ध साहित्यिका आहेत. त्यांनी सातत्याने अनेकविध विषयांचे लेखन केले आहे. त्यांचे झुळूक हे पुस्तक मला अतिशय आवडते. या पुस्तकात २४ लेख असून प्रत्येक लेखातील विषय वेगळे आणि परिचित आहेत. पाककृती, भविष्य, फोटो अल्बम, फेरीवाल्यांच्या आरोळ्या, लाडीकपणा, बालकलावंत म्हणजे आईचे मुलांनी कलादर्शन करण्यासाठी केलेले प्रयत्न, भाषांचे सरमिळस केलेले संवाद म्हणजे भाषासॅलड, पत्रलेखन, सिनेमा, जाहिराती, अक्षरलेखन, तत्त्वज्ञानाची वाक्ये, मुलांची ॲडमिशन त्यातील इंटरव्ह्यू, लग्न, बारसे, डोहाळेजेवण या प्रसंगी होणारे हौशी काव्य व गायन असे अनेकविध प्रसंग त्यातील गमंती, विनोद लेखिकेने अलगद टिपून वाचकांना खळखळून हसवले आहे. प्रत्येक प्रसंग कोठेही फापटपसारा न होता नेमकेपणाने लिहिला आहे. चपलख शब्दरचना हे लेखिकेच्या लिखाणाचे खास वैशिष्ट्य आहे. विनोदात कोठेही जडत्व न येता हलका-फुलका मजकूर, प्रगल्भ चांगला विनोद यामुळे दर्जेदार विनोदी पुस्तक वाचल्याचा आनंद मिळतो. विनोदाबरोबर त्या प्रसंगातील अतिरेक, अतिशोयोक्ती खाचाखोच या गोष्टीही कोणालाही न दुखविता लेखिकेने दाखविल्या आहेत. हे सुज्ञ वाचकांच्या लक्षात येते. एकूणच पुस्तकाच्या पानापानात हसऱ्या सुखद झुळूका मनाला प्रफुल्लीत करतात. पुस्तक वाचतावाचता खुदकन् ते अगदी पोट दुखेपर्यंत हसू अशा हास्य प्रकाराचा निखळ आनंद वाचकाला प्राप्त होतो. या आनंदासाठी प्रत्येकाने हे पुस्तक वाचावे.




## हरवलेल्या मंदिराचे रहस्य -सुधा मूर्ती

अनुष्का ही शहरी वातावरणात वाढलेली साहसी मुलगी. ती सुट्टीत आजी आजोबांकडे सोमनहळ्ळी या खेड्यात येते. तेथे तिची मेधा, आनंद, अमित यांच्याशी मैत्री होते. तसेच आजीकडे कॉलेज शिक्षण घेणारा व त्यांना फावल्या वेळात मदत करणारा महादेव या तरुणाशी तीची गट्टी जमते. शहरातील धावपळ अनुभवलेल्या तिच्या बालमनाला खेड्यातील शांत जीवनाचे अप्रुफ वाटते. आजी आजोबा व नव्या मित्रमैत्रिणींसोबत तिचे मजेत दिवस जाऊ लागतात. एक दिवस रानातून मित्रमंडळीबरोबर जाताना एका जुन्या पायऱ्या असलेल्या विहिरीचा शोध लागतो. ज्याबद्दल तिने आजी आजोबांकडून कथा ऐकलेली असते. तेव्हा तिला त्याबद्दल कुतुहलही निर्माण झालेले असते, अशी मुलांची साहसकथा, परंतु यात ग्रामीण आणि शहरी यातील फरक उत्तमरितीने मांडला आहे. तसेच आजी आजोबांच्या प्रेमाबरोबरच रोजच्या जगण्यातून अनेक भाज्या, फुले, औषधी वनस्पती यांची अनुष्काला ओळख होते. तसेच गुराढोरांची काळजी आणि निसर्गावर प्रेम करा अशा बऱ्याच गोष्टी शिकविल्या जातात. वाचताना मनोरंजनाबरोबर बालमनावर ठसतात. आजी आजोबांबरोबर शेत, बागेत फिरणे, नदीवरची सहल, नदीत पोहणे त्याचबरोबर रानावनात मित्रमैत्रिणीबरोबर फिरताना त्यांची मनापासून काळजी घेणारा महादेव यांची मैत्रीही वाचकांना आवडून जाते. त्यातच आजी आजोबांकडून ऐकलेल्या सोननायक हा प्रजाहितदक्ष राजा त्याच्या राज्यातील मंदिर असलेली पायऱ्यांची विहिर ही कथा ऐकताना वाचकही रंगून जातात व त्याबद्दल कुतूहल निर्माण होते. सुंदर विहिर व अप्रतिम डोळ्यापुढे साकार होते. तसेच ही विहिर सोमनहळ्ळी गावाजवळ आहे अशी दंतकथा आहे. या गोष्टीबरोबर पाण्याचे प्रदुषण, योग्य वापर, नियमांचे पालन करा या गोष्टीचेही महत्त्व समजते. वळणाचा पाऊस पडल्यावर मुले रानात फिरायला जातात. अनुष्का मात्र चिखलात फसते. महादेव व मित्रमंडळी तिला बाहेर ओढतात, परंतु तिचा बुट चिखलात रुततो. मुलांचे न ऐकता जिद्दी मुलगी बुट काढण्याचा प्रयत्न करते. त्यातूनच पुढे प्राचीन हरवलेल्या मंदिर आणि पायऱ्या असलेल्या विहिरीचा शोध कसा लागलो, त्यात आनंद, मेधा, अमित, महादेव नंतर आजी आजोबा, सरपंच, मुख्या शंकर गावकरी, इतिहासप्रेमी अब्दुल रशीद, त्याचे सहकारी, बालचमु एकजुटीने शोधकार्याला कशी मदत करतात. हे सर्व जाणून घेण्यासाठी मुलांमध्ये जिद्द, साहस निर्माण करणारी उत्कंठा वर्धक हरवलेल्या मंदिराचे रहस्य ही बालकांदबरी बालकांबरोबर सर्वांनीच वाचावी अशी आहे. अशा नितांत सुंदर लेखनाबद्दल लेखिकेला धन्यवाद.



| आवडलेली पुस्तके | लेखक |
|---|---|
| महाश्वेता | सुधा मुर्ती |
| हवा | अच्युत गोडबोले, अविनाश सरदेसाई |
| वणव्यातल्या वेली | रघुनाथ एम पाटील |
| रानसोबती | महाराष्ट्र मंगनाळे |
| गुजगोष्टी | विजया वाड |
| द्विदल | प्रवीण दवणे |
| जगण्यातील काही | अनिल अवचट |
| झिम्मा | विजया मोहन |
| संत कान्होपात्रा | ॲड. नंदकुमार मराठे |
| चौघीजणी | इंग्रजी लेखिका लुईसा मे अल्कॉट अनुवाद शांता ज. शेळके |
| स्वभाव विभाव | डॉ. आनंद कुळकर्णी |
| जोनाथन लिव्हिंगस्टन सीगल | मुळलेखक - रिचर्ड बाक अनुवाद - बाबा भांड |



## प्रतिघात -शरदचंद्र वाळिंबे

सत्येन व अनुप हे दोघे जिवलग मित्र असतात. शिक्षण पूर्ण होताच जमिनदार वडिलांच्या इच्छेनुसार अनुप नाइलाजाने होशंगाबाद येथे आपल्या गावी जातो. काळ पुढे सरकतो. सत्येन प्राध्यापक बनतो. अनुप हा पत्नी, तीन मुले असे संसारात रममाण होतो. पत्रमैत्री चालू राहते. नंतर पत्राचा कालावधी वाढतो. एक दिवस अनुपचे ६१ पानी पत्र येते. त्या पत्रात हवेतील घटलेल्या विलक्षण, भयानक दु:खद घटना लिहिलेल्या असतात. तीस पानात बारा जणांच्या आकस्मिक जाण्याच्या घटना होत्या. त्यात त्याचे दोन भाऊ, त्यांची मुले त्यांच्या समावेश होता. वीस पानातही अशाच घटना होत्या. शेवटच्या दहा पानात मंत्र, तोडगे, हटयोग, वाड्याला संरक्षण बांधणे अशा केलेल्या उपायांची माहिती होती. मधील पानात जयचंद नावाच्या पहारेकऱ्याची त्याच्या गायब झाल्याची घटना होती. तो गायब झाला तेथे जमीन होती. परंतू कुठेही झटापटीच्या खुणा मातीत दिसल्या नाहीत. परंतु दुसरा पहारेकरी साधुराम याने बारकाईने पाहिले असता त्याला मुंग्यांच्या पावलाचे ठसे दिसले. ठसे म्हणजे मातीतून मुंग्या जाताना रेघा उमटवतात. त्यांनी त्याबद्दल अभ्यास केला होता. त्यानंतर तीन पहारेकरी असेच गायब झाले होते. तेव्हाही त्याने मुंग्यांचे ठसे पाहिले होते. परंतु त्या बद्दल फारसे भाष्य नव्हते. या घटनांनी घाबरलेल्या अनुपने सत्येनला बोलावले होते. आणि सत्येननी होशंगाबादला जायची तयारी केली तसा तो एकटाच होता. कारण तो अजूनही अविवाहीत होता. प्रवासात त्याला एक सुंदर तरुणी भेटली. ती अनुपची एम.बी.बी.एस ला असणारी बहिणच होती. ती भावाकडे निघाली होती. त्यांचा परिचय पुढे हा प्रवास प्रेमापर्यंत पोहाचला. दोघेही होशंगाबादला आले. दु:खी झालेल्या अनुपला धीर आला. सत्येनला तेथे राहताना आजुबाजूला कोणाचाही तरी वावर आहे असे वाटत होते. तसेच जमिनीखाली हालचाल जाणवते. तो त्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु नंतर घडलेल्या घटना त्याला विचार करायला लावतात. एक नोकर जीवघेणा किंचाळतो. सत्येन व साधुराम क्षणार्धात तेथे जातात. तर त्याचा मांस खरबडलेला सापळा दिसतो. अल्पावधीत हे कसे घडले त्यानंतरही कल्पनावर एकतर्फी प्रेम करणारा मग्रुर स्त्रीलंपट उमाकांत व एक तरुणी त्यांचेही मृतदेह अशाच अवस्थेत सापडतात. तेव्हा सत्येन विचार करतो. त्याने वाचलेले लेख, साधुरामचे मत यावरुन इनसीड अँट नावाच्या भक्षक मुंग्या माणसाच्या फडशा क्षणार्धात पाडतात. त्या कोटी, अब्जाच्या संख्येने हल्ला करतात. अधिक माहितीसाठी सत्येन मुंबई विद्यापीठाच्या जीवशास्त्र विषयाचे प्रमुख प्रा. गायधनी यांनी सर्व कळवून येण्याची विनंती करतात ते ही या विषयावर सखोल अभ्यास करत असतात.

ते येण्याअगोदर त्या मुंग्या सत्येनला दिसतात. तो त्यांचे निरीक्षण करतो व त्यांच्याशी संभाषण करण्याची कला शिकतो. तेव्हा त्यांचे वर्णन, समुहजीवन, मंत्रीमंडळ, सभामांडणी, संभाषण या सर्वांचे विस्मयकारी वर्णन वाचताना वाचकाना एका वेगळ्या विश्वात गेल्यासारखे वाटते. सत्येन त्यांच्याशी संवाद साधून हा संहार थांबविण्याचा प्रयत्न करतो.

त्यानंतर संयमी प्रा. गायधनी, साधुराम सत्येन हा संहार कसा थांबवितात हे जाधून घेण्यासाठी प्रतिघात ही कादंबरी प्रत्येकाने वाचावी. शेवटही विलक्षण आहे.

विलक्षण प्रसंग, भय याबरोबर शेवटच्या पानापर्यंत पुढे काय घडेल हे कळत नाही, अशी ही उत्कंठावर्धक कादंबरी लिहिणे म्हणजे लेखकाचे कसबच आहे.



# पनवेलमध्ये महिलांना वाहनांचे प्रशिक्षण | आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका महिला व बालकल्याण समितीच्या माजी सभापती हर्षदा उपाध्याय यांच्या पुढाकाराने, महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या सहकार्याने आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली खारघर परिसरातील ५० महिलांना चारचाकी व तीनचाकी वाहनांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. ६) झाले. या वेळी त्यांनी या प्रशिक्षणामुळे महिला स्वयंपुर्ण होतील, असा विश्वास व्यक्त केला.

महिलांना पालिकेकडून अवघ्या ५२० रुपयांत चारचाकी आणि ४२० रुपयांत तीनचाकी वाहन चालवण्याचे प्रशिक्षण दिले जात आहे. उद्घाटनावेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, सभापती हर्षदा उपाध्याय, खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी स्थायी समिती सभापती ॲड. नरेश ठाकूर, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, निलेश बाविस्कर, माजी नगरसेविका अनिता पाटील, खारघर सरचिटणीस दीपक शिंदे, किंती नवघरे, अमर उपाध्याय, वासुदेव पाटील, युवा नेते समीर कदम, कांचन बिर्ला, गीता चौधरी, प्रतीक्षा कदम आदी उपस्थित होते.



# सीकेटी विद्यालयात चित्रकला स्पर्धा उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय इंग्रजी माध्यम येथील वाहतूक सुरक्षा समितीतर्फे भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांनी या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद दिला. या स्पर्धेत एकूण ४९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी वाहतूक सुरक्षा विभागाच्या अलका पाटील व प्रवीण अहिरे हे उपस्थित होते.

या वेळी शाळेचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाबद्दल माहिती देऊन, त्यांना अमृत महोत्सव कसा साजरा करावा याबद्दल मार्गदर्शन केले, तसेच सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. हा उपक्रम राबविल्याबद्दल वाहतूक सुरक्षा समितीचे आभार मानले. या कार्यक्रमास चित्रकला शिक्षक महेश पोपेटा व इतर सहकारी शिक्षकांनी सहकार्य केले.



**खारघर : भाजप नेते प्रभाकर घरत यांच्या मागणीनुसार बेलपाडा गावातील स्मशानभूमीत पत्रा शेड बसविण्यात आले आहे.**

# भाजपतर्फे आरोग्य शिबिर

**नवी मुंबई :** भारतीय जनता युवा मोर्चा, महामंत्री रणजित नाईक आणि सामजिक कार्यकर्त्या प्रणिता नाईक यांच्या पुढाकाराने माजी आमदार संदीप नाईक यांच्या वाढदिवसानिमित्त सिवूडस-दारावे सेक्टर २३ येथील भाजप जनसंपर्क कार्यालयात महाआरोग्य शिबिर घेण्यात आले होते. या शिबिराचा लाभ सिवूडस-दारावेमधील गरजू नागरिकांनी घेतला.



# जांभिवली येथे विविध सामाजिक उपक्रम
## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढिवसानिमित्त जांभिवली ग्रामपंचायतीमध्ये घेरावडी येथे शाळेत विद्यार्थ्यांना वह्या वाटप कार्यक्रम झाला. त्याच बरोबर उरणचे आमदार महेश बालदी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या वनवासी बांधवांना फिरता दवाखाना या माध्यमातून आरोग्य सेवा पुरवण्यात आली. या वेळी आदिवासी बांधवांचा चांगला प्रतिसाद पाहायला मिळाला.

या कार्यक्रमादरम्यान जांभिवली ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच रिया र. कोंडीलकर, प्रमुख पाहुणे पंकज शहा, आपटा विभागीय युवा अध्यक्ष कल्पेश कोंडिलकर, संदीप गोडीवले, रवींद्र कोंडिलकर, धर्मा कोंडिलकर, अनंता कोंडिलकर, नितेश टाकले, नागेश निरगुडा, परशुराम निरगुडा आदी उपस्थित होते.



# मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचे यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

प्रत्येक वर्षी मुंबई विद्यापीठा अंतर्गत युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून ऑनलाइन पध्दतीने युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. मुंबई विद्यापिठाच्या ५५व्या आंतरमहाविद्यालय सांस्कृतिक स्पर्धा म्हणजे युवा महोत्सव फेरीत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात प्रथम यश प्राप्त झाले आहे.

जिल्हास्तरावरून प्रथम फेरीमधे गेलेल्या इतर महाविद्यालयातील स्पर्धकांना मात देऊन मानसी तुमला हिने एकपात्री अभिनय स्पर्धमध्ये द्वितीय क्रमांक पटकविला, तसेच भारतीय लोकनृत्य स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्याच्या गटाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे विभाग प्रमुख प्रा. राहुल कांबळे व इतर सदस्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले व हे यश मिळविण्यासाठी मेहनत घेतली, तसेच विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या विविध कला गुणांचे सादरीकरण करून आपली जागा निश्चित केली. विद्यार्थी व विद्यार्थिनींना या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी मार्गदर्शन करून प्रोत्साहन दिले.

या स्पर्धेमध्ये यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या, तसेच आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी विद्यार्थ्यांचे व सांस्कृतिक विभागाचे अभिनंदन केले.



## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त

# कर्जतमध्ये बूस्टर डोस लसीकरण



(छाया : विजय मांडे)

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कर्जत भाजप मंडळ आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने सुनील गोगटे यांच्या जनसेवा कार्यालयात बुस्टर डोस लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते, यावेळी कोविशिल्ड आणि कोव्हॅक्सिनचे १५३बूस्टर डोस देण्यात आले.

सर्व नागरिकांना सहजतेने बूस्टर डोस उपलब्ध व्हावेत, या उद्देश शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उपजिल्हा रुग्णालयाच्या डॉ. संगीता दळवी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लसीकरण केले. भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, किसान मोर्चा कोकण समन्वयक सुनील गोगटे, कर्जतचे उपनगराध्य अशोक ओसवाल, तसेच दिनेश सोलंकी, विजय कुलकर्णी, मारुती जगताप, मिलिंद खंडागळे, समीर घरलुटे, प्रशांत उगले, शिरीष कदम, दिनेश गणिगा, श्रीनिवास राव, अभिजित पटेल, राहुल मसणे, अभिषेक तिवारी, सर्वेश गोगटे, आदित वांजळे, रवींद्र जाधव, दर्पण घारे, विश्वनाथ लोखंडे, गायत्री परांजपे, स्नेहा गोगटे, शर्वरी कांबळे, प्रीती तिवारी, सोनिया गरवारे, पुनम डेरवणकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक या वेळी उपस्थित होते.

## खड्डे पडल्यामुळे बोरघर फाटा-रामराज मार्गावरील एसटी वाहतूक बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग-रोहा मार्गावरील बोरघर फाटा ते रामराज या दोन किलो मीटर लांबीच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे एसटी महामंडळाने बोरघर फाटा ते रामराज मार्गावरील एसटी बस सेवा बंद केली आहे. त्यामुळे प्रवाशांना मुख्य रस्त्यावर येण्यासाठी दोन किलो मीटरची पायपटी करावी लागत आहे. त्यात विद्यार्थ्यांसह अलिबाग, रोह्याकडे जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

रामराज येथे शनिवारी आठवडा बाजार भरतो. या दिवशी खरेदीसाठी ग्राहकांची प्रचंड गर्दी असते. रोहा तालुक्यातील सानेगाव, दापोली, अलिबाग तालुक्यातील कुदे, सुडकोली, नांगरवाडी, ताजपूर, नवघर, उमटे, बेलोशी, महाजने, वावे, मल्याण, चिंचोटी, दिवीपारंगी, फणसापूर, बापळे भोनंग आदी गावांतील हजारो नागरिक रामराजमध्ये खरेदीसाठी येतात. अलिबाग-रोहा, अलिबाग-रामराज, रोहा-रामराज मार्गे अलिबाग अशा अनेक बसेस या मार्गावरून सुरु करण्यात आल्या आहेत. बोरघर फाटा ते रामराज मार्गावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या रस्त्याला तळ्याचे स्वरुप निर्माण होत आहे. या खड्डेमय रस्त्यावरून प्रवास करताना प्रवाशांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तसेच वाहनांध्ये बिघाड होण्याचे प्रमाणही वाढत आहे. त्याचा फटका खासगी वाहनचालकांसह एसटी महामंडळालादेखील बसत आहे. बोरघर फाटा ते रामराज रस्ता दुरुस्त न केल्यामुळे या मार्गावरील एसटी वाहतूक बंद करण्यात आली आहे.

> **रामराज ते बोरघर फाटा मार्गावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. या मार्गावरून एसटीची वाहतूक करणे धोकादायक आहे. खड्डे भरून घेण्याबाबत जिल्हा परिषद व पंचायत समिती बांधकाम विभागाला पत्र देण्यात आले आहे. मात्र या यंत्रणांकडून दखल घेतली नाही. त्यामुळे गेल्या आठ दिवसापासून बोरघर फाटा ते रामराजपर्यंतची एसटी सेवा बंद करण्यात आली आहे.**
> **-अजय वनारसे, आगार व्यवस्थापक, अलिबाग**

## सुभाषनगर रस्त्याला स्व. सखाराम जाधव यांचे नाव द्या

### ▮ आमदार प्रशांत ठाकूर यांचे खोपोलीच्या मुख्याधिकाऱ्यांना पत्र

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेत सलग तीन वेळा निवडून येत सखाराम गेणू जाधव यांनी उपनगराध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत अनेक विकासकामे केली आहेत. सुभाषनगर तसेच खोपोलीच्या जडणघडणीत जाधव मामांचा सर्वात मोठा वाटा आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून सुभाषनगर रस्त्याला स्व. सखाराम जाधव यांचे नाव द्या तसेच परिसर सुशोभीकरण करण्याच्या ग्रामस्थांच्या मागणीचा तातडीने विचार व्हावा, असे आमदार प्रशांत ठाकूर यांचे पत्र शुक्रवारी (दि. ५) नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी अनुप दुरे यांना देण्यात आले.



(छाया : विनायक माडपे)

खोपोली भाजपच्या वतीने युवा नेते व सुभाषनगरचे प्रमुख ग्रामस्थ राहुल जाधव, महिला मोर्चा शहर अध्यक्षा शोभाताई काटे, चिटणीस गोपाळ बावस्कर, वैद्यकीय सेलचे सहसंयोजक विकास खुरपुढे, सागर काटे यांनी हे पत्र नगरपालिकेचे प्रशासक अनुप दुरे यांना दिले. या वेळी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

शहरातील रेल्वे गेट-मस्को गेट ते सुभाषनगर या रस्त्याला स्वर्गीय सखाराम गेणू जाधव मार्ग व त्यांच्या घरासमोरील चौकाला जाधव मामा चौक असे नाव द्यावे, अशी मागणी सुभाषनगरमधील नागरिक गेले अनेक वर्षे नगर परिषदेकडे करीत आहेत.

१० फेब्रुवारी रोजी आजी-माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन या मागणीचे समर्थन करीत तसे पत्र दिले होते. ग्रामस्थांच्या या मागणीची दखल घेत भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक अनुप दुरे यांना पत्र दिले आहे.

## कार्लेखिंडीत भरधाव कार दरीत कोसळली

### ▮ पोलिसांनी जखमींना काढले बाहेर

**अलिबाग : प्रतिनिधी**

चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने अलिबागकडून पेण दिशेने जाणारी भरधाव कार शुक्रवारी (दि. ५) रात्री कार्लेखिंडीतील खोल दरीत कोसळली. या अपघातात जखमी झालेल्या तिघांना पोलिसांनी दरीतून बाहेर काढले.

अलिबाग येथून एक कार शुक्रवारी रात्री पेण दिशेकडे जात होती. कारमध्ये तीन प्रवासी होते. कार्लेखिंडीत चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कार २०फुट खोल दरीत कोसळली. या अपघातात जखमी झालेले कारमधील प्रवासी मदतीसाठी आरडाओरड करीत होते. त्यावेळी योगायोगाने जिल्हागस्त करुन परतणारे पोलीस निरीक्षक जगताप, पोलीस नाईक मितेष म्हात्रे व चालक पाटील तेथे पोहोचले. खोल दरी, गर्द अंधार, पावसामुळे झालेला निसरडा रस्ता, चिखल याची पर्वा न करता जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नितिन पाटील यांनी तात्काळ खोल दरीत उतरुन जखामींना वर आणण्यासाठी प्रयत्न केले. पोलीस नाईक म्हात्रे यांनी रेस्क्युसाठी लागणाऱ्या रस्सी आणि बटरी यांची उपलब्धता करुन तात्काळ रुग्णवाहिका बोलावून घेतली. अलिबाग व पोयनाड पोलीस ठाणे यांना झालेल्या घटनेबाबत कल्पना दिली. त्यामुळे सुमारे एक तासाच्या रेस्क्यु ऑपरेशननंतर जखमींना अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात पोलिसांना यश आले. त्यावेळी अलिबाग व पोयनाड पोलीस ठाण्यांतील कर्मचारी घटनास्थळावर हजर झाले.

## पत्नीची बदनामी प्रकरण; पतीकडून तक्रार दाखल

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील वहूर या गावातील एका राहिवशाला त्याच्या मोबाइलवर त्याच्या पत्नीबाबत आक्षेपार्ह विधान करत पत्नीचे आक्षेपार्ह फोटो व्हॉट्सअ‍ॅप आणि इंटरनेटवर व्हायरल करत बदनामी केल्याप्रकरणी एका अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वहूर गावातील फरजान महामुदखान देशमुख (वय ४५) यांना १ ऑगस्ट २०२२ रोजी संध्याकाळी ७ आणि ८ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या मोबाइलवर एका अज्ञात इसमाने फोन करून त्यांच्या पत्नीबाबत आक्षेपार्ह विधान करून व्हॉट्सअ‍ॅप आणि इंटरनेटवर फोटो टाकत बदनामी करण्याची धमकी दिली. या प्रकरणी देशमुख यांनी दिलेल्या तक्रारवरून महाड शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात भादवी कलम ६६(ई),६७,६७(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



(छाया : विजय मांडे)

## कर्जत न.प. मध्ये ध्वज वितरण कक्ष

**कर्जत : प्रतिनिधी**

नगर परिषद कार्यालयात ध्वज वितरण कक्ष सुरू करण्यात आला आहे. कर्जत शहरातील प्रत्येक प्रभागात ध्वज मिळण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे. स्वयंसेवी संस्था, मंडळ, इच्छुक स्वयंसेवकांनी, सर्व नागरिकांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे आणि तिरंग्याचा सन्मान करावा, असे आवाहन नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी केले आहे.

कर्जत नगर परिषद घरोघरी तिरंगा या मोहिमेअंतर्गत कामाचा आढावा घेण्याकरिता बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, सभापती राहुल डाळींबकर उपस्थित होते. त्यांनी कर्मचाऱ्यांकडून कामाचा आढावा घेवून पुढील रुपरेषा ठरवली. त्यानंतर नगर परिषद कार्यालयात ध्वज वितरण कक्ष सुरू करण्यात आला.

## मुरूड मासळी मार्केट रस्त्यावर मोठे खड्डे

### ▮ सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातून सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर मासळी मार्केट आहे. अनेक दिवसापासून या मासळी मार्केट परिसरातील रस्त्यावर दोन मोठे खड्डे पडले असून त्यात पावसाचे पाणी साचून तलाव निर्माण झाले आहेत. मात्र सार्वजनिक बांधकाम खाते हे खड्डे बुजविण्यासाठी कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

मुरूड शहरातून जंजिरा किल्ल्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर असंख्य पर्यटकांची नियमीत वर्दळ असते. शिवाय मासळी मार्केट असल्यामुळे सदरचा रस्ता गर्दीचा आहे. मासळी मार्केटला लागून कोळीवाडा आहे. या परिसरातील गणरायांचे आगमन याच रस्त्याने होत असते. या रस्त्याच्या मधोमध मोठे खड्डे पडले असल्याने गणरायांचे आगमन कसे होणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या या खड्ड्यांत मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने सदरचे खड्डे तलावासारखे झाले आहेत. या प्रमुख रहदारीच्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.



(छाया : संजय करडे)

## कर्जतमधील आदिवासी विद्यार्थ्यांना रेनकोट भेट

**कर्जत : बातमीदार**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त नवी मुंबई येथील श्री साई ट्रस्टने कर्जत तालुक्यामधील आदिवासी भागातील बेकरेवाडी, आसलवाडी आणि नाण्याचामाळ येथील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांना रेनकोट आणि खाऊ वाटप केले.

आदिवासी विद्यार्थ्यांना रेनकोट भेट द्यावे, अशी विनंती कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप घुले यांनी श्री साई ट्रस्टकडे केली होती. त्यानुसार ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले, डॉ. निर्मला राव, डॉ. श्रीधरन यांनी कार्यकर्त्यांसह दुर्गम भागातील बेकरेवाडी, आसलवाडी आणि नाण्याचा माळ येथे चालत जाऊन आदिवासी विद्यार्थ्यांना रेनकोट व खाऊचे वाटप केले.



(छाया : संतोष पेरणे)

या वेळी बेकरेवाडी शाळेचे शिक्षक अहिरे, रुपेश मोरे यांच्यासह ग्रामस्थ गणेश पारधी उपस्थित होते.



(छाया : सलीम शेख)


## माणगावमधील संगमेश्वर मंदिर परिसराची स्वच्छता

### छत्रपती करिअर अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे श्रमदान

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती करिअर अ‍ॅकॅडमी आर्मी व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार (दि.५) सकाळी स्वच्छता मोहीम राबवून, जुने माणगाव येथील श्री संगमेश्वर मंदिराचा परिसर चकाचक केला.

माणगाव येथील छत्रपती करिअर अ‍ॅकॅडमी आर्मी व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्राचे ५५ विद्यार्थी शुक्रवारी सकाळी ७.३०वाजण्याच्या दरम्यान निजामपूर रोड येथून धावत श्री संगमेश्वर मंदिरात आले होते. त्यांनी वाहतूक पोलीस निवास साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व अ‍ॅकॅडमीच्या संस्थापिका माधुरी निवास साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली मंदिर परिसर स्वच्छ केला. या उपक्रमाचे संगमेश्वर नगरातील ग्रामस्थांनी विशेष कौतुक केले.



## खोपोली मंडळातील शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीविषयी प्रशिक्षण

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली मंडळ कार्यक्षेत्रातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी शेताच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या क्षेत्राची ई पीक पाहणीद्वारे नोंद केली. तसेच त्याचे प्रात्यक्षिक दाखवून, यापुढे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतातील पिकाची नोंद ई पीक पाहणी व्हर्जन २ अ‍ॅपव्दारे कशी करायची, हे समजवून सांगितले.

शासनाचा ई-पीक पाहणी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १५ ऑगस्ट २०२१ पासून रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार शेतकऱ्याने आपल्या शेतातील पिकाची नोंद आपल्या शेतात उभे राहून इ पिक पाहणी व्हर्जन २ या अ‍ॅपव्दारे करायची आहे. त्याची माहिती शेतकऱ्यांना व्हावी, यासाठी तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली खोपोली मंडळातील सर्व तलाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांना ई-पीक पाहणी व्हर्जन २ या अ‍ॅपबाबत माहिती देऊन जनजागृती करीत आहेत.



(छाया : अरुणा नलावडे)

आजतगायत खोपोली मंडळातील आडोशी, ताकई, लव्हेज, कांढरोली तर्फे बोरेटी, वणी, हाळखुर्द, खालापूर व चिचवली शेकीन या गावामध्ये प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन ई-पीक पाहणी व्हर्जन २ या अ‍ॅपच्या प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीचे काम मंडळातील तलाठी व कोतवाल यांच्यामार्फत करण्यात आले असून अन्य गावांमध्येदेखील लवकरच प्रचार, प्रसिध्दी व जनजागृतीचे काम पुर्ण केले जाणार आहे.

सर्व शेतकरी बांधवांनी ई-पीक पाहणी व्हर्जन २ हे अ‍ॅप डाऊनलोड करून पीक पाहणीची ऑनलाइन नोंद करून घ्यावी, असे आवाहन खोपोली मंडळ अधिकारी सचिन वाघ व त्यांचे सहकारी तलाठी रणजीत कवडे, भरत सावंत, दिप्ती चोणकर, सुवर्णा कोल्हे, प्रतिक बापर्डेकर यांनी केले आहे.

### ■ अ‍ॅप व्हर्जन २ विकसित

*ईपीक पाहणी अ‍ॅपमध्ये काही महत्त्वाचे बदल करून शेतकऱ्यांसाठी वापरण्यास अत्यंत सोपे व सुटसुटीत मोबाइल अ‍ॅप व्हर्जन २विकसित करण्यात आले आहे. सुधारित मोबाइल अ‍ॅपमध्ये राज्यातील प्रत्येक गटाच्या मध्यबिंदूचे अक्षांश व रेखांश समाविष्ट करण्यात आले असून, शेतकरी ज्यावेळी पीक पाहणी करताना पिकाचा फोटो घेतील, त्यावेळेस फोटो घेण्याच्या ठिकाणापासून त्या गटाच्या मध्यबिंदूपर्यंतचे अंतर आज्ञावलीमध्ये दिसणार आहे. शेतकरी पीक पाहणीसाठी निवडलेल्या गटापासून दूर असल्यास त्यांना त्याबाबतचा संदेश मोबाइल अ‍ॅपमध्ये दर्शविण्यात येणार आहे. या सुविधांमुळे पिकाचा अचूक फोटो घेतला आहे किंवा नाही, हे निर्धारित करता येणार आहे.*

### ■ पीकपाहणी दुरुस्तीची सुविधा

*ई-पीक पाहणी अ‍ॅपद्वारे नोंदविल्यानंतर ४८ तासांमध्ये स्वतःहून केव्हाही एक वेळेस दुरुस्त करता येईल. तसेच ई-पीक पाहणी मोबाइल अ‍ॅपमध्येच गावातील खातेदारांनी नोंदविलेल्या पीक पाहणीची माहिती पाहण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.*

## आमदार चषक २०२२ रबर बॉल स्पर्धा

# रायगड उरण धनविन संघ प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेल्या आमदार चषक २०२२ रबर बॉल स्पर्धेत रायगड उरण धनविन संघाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात ही स्पर्धा दोन दिवस रंगली. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ५) झाला. या वेळी त्यांनी विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला.

पनवेल शहरातील मिडल क्लास हौसिंग सोसायटीच्या मैदानात आमदार चषक २०२२ ही रबल बॉल क्रिकेट स्पर्धा भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, प्रशांत कर्पे, सुमित झुंझारराव यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते झाले, तर स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या स्पर्धेत रायगड उरण धनविन संघाने प्रथम क्रमांक पटकावला. त्यांना ५० हजार रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या कोळेश्वर कोळीवाडा पनवेल संघाला २५ हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत उत्कृष्ट फलंदाज म्हणून संकेत रानडे, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून हर्षद कोळी, मालिकावीर म्हणून योगेश पवार यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, विकास घरत, सुखम हॉस्पिटलचे डॉ. संतोष जाधव, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड अध्यक्ष मयुरेश नेतकर, युवानेते हॅप्पी सिंग, दिनेश खानावकर, अभिषेक भोपी, चिन्मय समेल, प्रशांत कर्पे,सुमित झुंझारराव, राकेश भूजबळ, सौरभ कुलकर्णी, उल्हास झुंझारराव यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि खेळाडू उपस्थित होते.

# कुस्तीमध्ये भारताकडे पदकांची बरसात


## बजरंग, साक्षी, दीपकची सुवर्ण, तर अंशूची रौप्यकमाई

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

भारतीय कुस्तीगीरांनी शुक्रवारी (दि. ५) पदकांची बरसात केली. ऑलिम्पिक पदक विजेत्या बजरंग पुनिया (६५ किलो), दीपक पुनिया (८६ किलो) आणि साक्षी मलिक (६२ किलो) यांनी सुवर्णपदक पटकावले, तर अंशु मलिकला (५७ किलो) रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

बजरंग पुनियाने ६५ किलोच्या अंतिम लढतीत आक्रमक खेळ केला. त्याचवेळी कॅनडाचा प्रतिस्पर्धी लाच्लान मॅकनिलकडून सातत्याने पायावर होणारे आक्रमण बजरंगने चपळता दाखवून प्रत्येक वेळेस परतवून लावले. निर्णायक विजय मिळवून अंतिम फेरीत आलेल्या बजरंगने सुवर्ण लढतीत अखेरीस ९-२ असा विजय मिळवला.

बजरंगपाठोपाठ साक्षी मलिकने भारताला कुस्तीमधील दुसरे सुवर्णपदक मिळवून दिले. साक्षीला सुवर्णपदकाच्या लढतीत मात्र कॅनडाच्या ॲना गोन्झालेसविरुद्ध पहिल्या फेरीत ०-४ असे पिछाडीवर राहावे लागले होते, मात्र दुसऱ्या फेरीत सुरुवातीलाच दुहेरी पट काढून साक्षीने दोन गुणांची कमाई केली आणि नंतर धोकादायक स्थितीत आलेल्या क्षणाचा फायदा उठवून गोन्झालेसला चितपट करून सुवर्णपदक मिळवले.



महिला विभागातील ५७ किलो लढतीत अंशू मलिकला नायजेरियाच्या ओडुनायो ॲडेकुओरोयेचे आव्हान पेलवले नाही. अंशूला सुवर्णपदकाच्या लढतीत ओडुनायोकडून ३-७ असा पराभव पत्करावा लागला. पुरुषांच्या ८६ किलो वजनी गटात भारताच्या दीपक पुनियाने पाकिस्तानच्या मुहम्मद इनामविरुद्ध ३-० अशी बाजी मारली.

# विजय आर्मी स्कूलमध्ये साहसी व क्रीडा प्रशिक्षण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील चिखले येथील विजय आर्मी स्कूल व ज्युनियर कॉलेज येथे छत्रपती शिवाजी महाराज नॅशनल मेमोरियल ट्रस्ट व नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी व क्रीडा प्रशिक्षण संस्था, विजय नाना स्पोर्ट्स ॲडवेंचर अँड रायफल सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने साहसी व क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी शाळेचे प्राचार्य एम. के. मराठे यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिरास सुरुवात केली. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी विकास लाटे, रवींद्र पानकडे, अमोल आठवले, सौरभ दराडे, दिपक जगदाळे, समित आव्हाळे तसेच आश्रमशाळा चिखलेचे शिक्षक राजेश राठोड, व्ही. एल. काटकर उपस्थित होते. उपप्राचार्य एस. पी. पाटील यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

विद्यार्थ्यांसोबत शाळेचे कमांडंट पी. व्ही. आर. कृष्णन, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सैनिक निर्देशक, संगणक निर्देशक या सर्वांनी विविध साहसी कौशल्याचे प्रशिक्षण घेतले.

## बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धा

# भारताच्या 'अ' संघाची 'क' संघावर मात

**चेन्नई : वृत्तसंस्था**

अर्जुन इरिगेसी आणि एसएल नारायणन् यांच्या निर्णायक विजयांमुळे खुल्या विभागातील दुसऱ्या मानांकित भारतीय अ संघाने शुक्रवारी (दि. ५) ऑलिम्पियाड बुद्धिबळ स्पर्धेच्या सातव्या फेरीत भारताच्या क संघावर ३-१ अशा फरकाने मात केली.

या स्पर्धेत प्रथमच दोन भारतीय संघ आमनेसामने आल्याने उत्सुकता होती. भारताच्या अ संघात आघाडीच्या खेळाडूंचा समावेश असल्याने त्यांचे या लढतीत पारडे जड मानले जात होते, मात्र क संघाने त्यांना चांगली झुंज दिली. अ संघाकडून पहिल्या दोन पटांवर खेळणाऱ्या पी. हरिकृष्णा आणि विदित गुजराथी यांना अनुक्रमे सूर्यशेखर गांगुली आणि एस. पी. सेतुरामन यांनी बरोबरीत रोखले, परंतु तिसऱ्या पटावरील इरिगेसीने अभिजित गुप्ताला ४६ चालींमध्ये नमवले, तर नारायणनने अभिमन्यू पुराणिकचा ३८ चालींमध्ये पराभव केल्याने भारताच्या अ संघाने या लढतीत सरशी साधली.

याच विभागातील भारताच्या ब संघाने क्युबाला ३.५-०.५ असे पराभूत केले. डी. गुकेशने सलग सातव्या विजयाची नोंद करताना कार्लोस कब्रेरावर ४६ चालींमध्ये मात केली, तसेच निहाल सरिन आणि आर. प्रज्ञानंद यांनाही विजय मिळवण्यात यश आले. अनुभवी बी. अधिबनला मात्र ओमार क्विंटानाने बरोबरीत रोखले.

महिला विभागातील अग्रमानांकित भारताच्या अ संघाने विजयी घोडदौड सुरू ठेवताना अझरबैजानचा २.५-१.५ असा पराभव केला. त्यांचा हा सलग सातवा विजय ठरला. पहिल्या पटावरील कोनेरू हम्पीने गुनाय ममाझादाकडून हार पत्करली, परंतु आर. वैशाली आणि तानिया सचदेव यांनी आपापले सामने जिंकत भारतीय संघाला आघाडी मिळवून दिली. द्रोणावल्ली हरिकाचा सामना बरोबरीत सुटल्याने भारतीय अ संघाचा विजय सुनिश्चित झाला. या लढतीपूर्वी भारत अ आणि अझरबैजान हे संघ महिला विभागाच्या गुणतालिकेत अव्वल दोन स्थानांवर होते. त्यामुळे भारतीय अ संघासाठी हा विजय महत्त्वाचा आहे. भारताच्या ब संघाने ग्रीसकडून पराभव पत्करला, तर क संघाने स्वित्झलडवर ३-१ अशी मात केली.

# पुण्यात अल्टिमेट खो-खो लीग

**मुंबई : प्रतिनिधी**

अल्टिमेट खो-खो लीग १४ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरदरम्यान पुण्याच्या बालेवाडी स्टेडियममध्ये होणार आहे. या अल्टिमेट खो-खो लीगच्या पहिल्या हंगामात मुंबई खिलाडीज संघाचा सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न असेल, असा मानस संघाचा कर्णधार विजय हजारेने व्यक्त केला.



आमच्याकडे अनुभवी प्रशिक्षक आहेत. देशातील कानाकोपऱ्यातील खेळाडूंचा संघात भरणा आहे. त्यामुळे संघाचा आपल्या सर्वोत्तम कामगिरीचा प्रयत्न असेल. आमचा सराव योग्य दिशेने सुरू असून लीगमध्ये चमक दाखवण्यासाठी उत्सुक आहोत, असे कोल्हापूरचा विजय म्हणाला. मुंबई खिलाडीज संघाचे मालक पुनित बालन, जान्हवी धारिवाल बालन, गायक बादशाह यांच्या उपस्थितीत मुंबईत संघाच्या जर्सीचे अनावरण करण्यात आले. या वेळी संघातील सर्व खेळाडूंसह मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकर श्री, मुख्य प्रशिक्षक राजेंद्र साप्ते आणि साहाय्यक प्रशिक्षक शोभी आर. उपस्थित होते.

# ॲथलेटिक्समध्ये श्रीशंकरला रौप्यपदक

**बर्मिंगहॅम : वृत्तसंस्था**

लांबउडीत भारताच्या मुरली श्रीशंकरने रौप्यपदकाची कमाई केली. राष्ट्रकुल स्पर्धेत भारताने पुरुष विभागात तब्बल ४४ वर्षांनी पदकाला गवसणी घातली.

श्रीशंकरने रौप्यपदकाला गवसणी घातली असली, तरी त्याचा मार्ग कठीण होता. तिसऱ्या प्रयत्नात त्याने ७.८४ मीटर उडी मारली, तेव्हा श्रीशंकर सहाव्या स्थानावर होता. चौथ्या प्रयत्नात श्रीशंकरला खेळातील नव्या तंत्राचा फटका बसला. श्रीशंकरचा चौथा प्रयत्न अपयशी ठरवण्यात आला. हातात केवळ दोनच प्रयत्न शिल्लक असताना तेव्हा त्याचे वडील आणि प्रशिक्षक एस. मुरली यांनी श्रीशंकरला



कानमंत्र दिला. याचा फायदा इतका झाला की, श्रीशंकरने ८.०८ मीटर उडी मारताना आपले रौप्यपदक निश्चित केले.

सुवर्णपदक विजेता बहामासचा लॅक्वान नैर्नने ८.०८ मीटर उडी मारली होती. अखेरचा प्रयत्न सुरू झाला, तेव्हा काऊंटबॅकचा निर्णय घेण्यात आला. यात नैर्न ७.९८ मीटरपर्यंत पोहोचला होता. श्रीशंकरला ७.९९ मीटर उडी मारायची होती.

> **राष्ट्रकुल स्पर्धेतील पदक हे पहिले पाऊल आहे. पॅरिस ऑलिम्पिक मला खुणावत आहे. राष्ट्रकुल स्पर्धेतील या रौप्यपदकाने मला आनंद झाला आहे. मला प्रेरित करणाऱ्या प्रत्येक भारतीयाला मी हे पदक अर्पण करतो.**
>
> **-मुरली श्रीशंकर**

अखेरच्या प्रयत्नांत श्रीशंकर ७.८४ मीटपर्यंतच पोहचला. त्यामुळे सर्वोत्तम दुसरा प्रयत्न या नियमाच्या आधारावर त्याला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले.

# पवनवर दोन कोटी, २६ लाखांची विक्रमी बोली

## तमिळ थलायवा संघात सामील

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रो कबड्डी लीगच्या नवव्या हंगामासाठी शुक्रवारी (दि. ५) मुंबईत झालेल्या लिलाव प्रक्रियेच्या पहिल्या दिवशी पवन शेरावतवर दोन कोटी, २६ लाखांची विक्रमी बोली लागली. यू मुंबाशी बोलीयुद्ध जिंकत तमिळ थलायव्हाजने त्याला आपल्या संघात सामील केले.

लिलावाच्या पहिल्या दिवशी झालेल्या अ-गटाच्या लिलावात अपेक्षेप्रमाणेच तीन खेळाडूंनी एक कोटींचा आकडा पार केला. विकास खंडोलाला बंगळुरु बुल्सने एक कोटी, ७० लाख रुपये मोजत ताफ्यात घेतले. प्रो कबड्डीच्या आठव्या



हंगामात प्रदीपसाठी एक कोटी, ६५ लाखांची विक्रमी बोली लागली होती. तो विक्रम पवन व विकास यांनी मोडीत काढला. पुणेरी पलटणने इराणचा डावा कोपररक्षक फझल अत्राचालीवर एक कोटी, ३८ लाख रुपयांची, तर अष्टपैलू मोहम्मद ईस्माइल नबीबक्षसाठी ८७ लाखांची बोली लावली. यू मुंबाने ब-गटातील गुमान सिंगवर एक कोटी, २२ लाखांची बोली लावली.

# प्रभात कोळीची उतुंग कामगिरी

## आशिया खंडातील ठरला सर्वोत्कृष्ट जलतरणपटू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय जलतरणपटू प्रभात कोळीने अमेरिकेतील लेक टाहो (३५ किमी) अंतर १२ तास ३७ मिनिटांत पार केले असून अशी कामगिरी करणारा आशिया खंडातील प्रथम जलतरणपटू होण्याचा मान प्रभातने मिळवला आहे. त्याचप्रमाणे वर्ल्ड ओपन वॉटर स्विमिंग असोसिएशनचा कॅलिफोर्नियन ट्रिपल क्राऊन पटकावणारा देखील आशिया खंडातील तो पहिला जलतरणपटू ठरला.

कॅलिफोर्नियन ट्रिपल क्राऊन या वर्ल्ड ओपन वॉटर स्विमिंग असोसिएशनच्या नामांकनामध्ये अमेरिकेतील कॅटलिना चॅनेल (३४ किमी) सांताबार्बारा चॅनेल



प्रभात कोळी याने केलेल्या विक्रमाबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्याचे अभिनंदन केले. या वेळी ज्येष्ठ नेते वसंतशेठ पाटील, चंद्रकांत घरत, प्रभातचे वडील राजू कोळी उपस्थित होते.

(२० किमी) तसेच लेक टाहो लेंगथ स्विम (३५ किमी) या अतिशय खडतर जलतरण मोहिमांचा समावेश आहे. प्रभात कोळीने ही तिन्ही आव्हाने यशस्वीरित्या पार करीत आशिया खंडातील प्रथम जलतरणपटूचा मान मिळविला. लेक टाहोमध्ये जलतरण करण्यासाठी प्रभातने प्रथम उलवा नोड येथे असलेल्या रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या स्विमिंग पूलमध्ये सराव केला असून त्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रभातने विशेष आभार मानले.

प्रभातने ट्रिपल क्राऊन ऑफ ओपन वॉटर हे नामांकन २०१७मध्ये पटकावले होते. आजतागायत आंतरराष्ट्रीय १८ जलतरणाच्या मोहीम फत्ते करणारा एकमेव भारतीय जलतरणपटू आहे. प्रभातला भारत सरकारने तेनझिंग नोर्गे पुरस्काराने राष्ट्रपतींच्या हस्ते २०१९ साली, तसेच शिवछत्रपती पुरस्काराने २०२०मध्ये सन्मानित करण्यात आले आहे. प्रभातच्या पराक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्स्, तसेच लिमका बुक ऑफ रेकॉर्ड्स्मध्ये पाच विक्रमांची नोंद करण्यात आली आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com